# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY
4/2/06

३ ● उपक्रम
५ ● चीनमधील ग्राहक-क्रांती
१० ● 'जेन्डर बजेट'ची पूर्वतयारी
१४ ● सातत्यपूर्ण विकासासाठी हवे स्त्रियांच्या हाती अधिकार
१९ ● समानतेच्या युगात ग्रामीण स्त्रियांचे स्थान कुठे ?
२५ ● ग्रामीण रोजगार हमी कायदा म्हणतो......
३४ ● टायर्सद्वारेही प्रदूषण
३८ ● जिकडे-तिकडे
● वाद साखरेच्या पर्यायाचा
● हाडांसाठी वनौषधी उपयुक्त
● टिश्यू पेपर्स
४० ● 'काल'चे 'आज'साठी
(जराहि न दिसेल बेकारी वाढली कोठे..)

खंड ४ : अंक ११ फेब्रुवारी २००६

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---


**<u>वर्गणीसाठी पत्ता</u> :**

व्यवस्थापक,

**अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२

: २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल : ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ४ (अंक ११) फेब्रुवारी २००६**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेखन देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्दिष्ट. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆ अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

> **जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.**

# उपक्रम

एकेका महिन्याची सांगड एकेका घटनेशी पडलेली असते. अथवा, आपण ती सांगड तशी घालतो, असे म्हणणे हे अधिक संयुक्तिक ठरेल. फेब्रुवारी महिना म्हटला की आठवतो अर्थसंकल्प. दरवर्षी न चुकता साजऱ्या होणाऱ्या या आन्हिकाप्रतीचे दरवर्षीचे आपले कुतूहलही तितकेच नवथर असते. यंदा मात्र हाच फेब्रुवारी महिना एकाऐवजी दोन उत्कंठावर्धक चीजा पोतडीत घेऊन आला आहे. अर्थसंकल्प ही झाली त्यातील एक चीज. दुसरा ऐवज आहे तो 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा'नामक एका नवीन आणि महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा. देशाला भेडसावणाऱ्या बेरोजगारीच्या समस्येवर तोडगा म्हणून केंद्रातील सत्ताधारी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने अशा कायद्याची हमी पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यातच दिली होती. गेल्या ५ सप्टेंबर २००५ रोजी त्या संबंधीच्या विधेयकास मंजुरी देऊन सरकारने त्या आश्वासनाची पूर्तता केली आणि या कायद्याच्या अंमलबजावणीचा शुभारंभ या फेब्रुवारी महिन्याच्या दोन तारखेपासून केला जाईल, असे जाहीर करून त्यापुढील पाऊलही उचलले. या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या विविधांगांची साधकबाधक चर्चा करण्यासाठी भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने ३० व ३१ डिसेंबर २००५ रोजी दोन दिवसांचे एक चर्चासत्र आयोजित केले होते. हा कायदा, त्याचे अंतरंग, त्यातील विविध तरतूदी, त्यांची कार्यवाही, संभाव्य परिणाम अशा अनेकानेक बाबींचा ऊहापोह या विषयासंदर्भात विशेष रुची असणाऱ्या अभ्यासक-प्रशासकांनी या चर्चेदरम्यान केला. दोन दिवस झालेल्या या विचारविनिमयाची विस्तृत टिपणेही तयार करण्यात आली. खरे म्हणजे, देशाच्या केवळ अर्थकारणाच्याच नव्हे तर समाजकारणाच्या दृष्टीनेही अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या रोजगारनिर्मितीसारख्या एका संवेदनशील विषयावरचे हे विचारगर्भ मंथन 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांपर्यंत तितक्याच तपशीलवारपणे पोहोचविण्यासाठी या विषयाला वाहिलेला एक विशेषांकच तयार करावा, असा एक विचार मनात घोळत होता. परंतु, 'पत्रिके'च्या वाचकांचे वाचनाबाबतचे रुचिवैचित्र्य ध्यानात घेता रोजगारासारख्या *(पान २४ वर पाहावे)*

# वाचकांचा प्रतिसाद

डिसेंबर २००४पासून मी आपला नियमित वर्गणीदार -वाचक आहे. आपली 'अर्थबोधपत्रिका' मला खूप आवडते. देश-विदेशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक इत्यादी संदर्भात मौल्यवान असे बौद्धिक खाद्य त्यामध्ये असते. अवतीभोवती घडणाऱ्या अनेक घटनांची माहिती मिळते व वैचारिक मंथनास वाव मिळतो. आपणास एक नम्र विनंती अशी की आगामी एखाद्या अंकात आपण 'बॅक्टेरियल एस्परांटो' या संदर्भात विस्तृत लेख द्यावा. महाराष्ट्रातील एका वृत्तपत्राने 'सूक्ष्म जीवांचं बोलणं ऐकणारे शास्त्रज्ञ' या मथळ्याचा एक लेख अलीकडेच प्रसिद्ध केला होता. तो वाचल्यापासून मला या विषयावर अधिक माहिती तपशीलवार वाचण्याची तीव्र इच्छा झाली. म्हणून आपल्याला एक वाचक या नात्याने हक्कानं पण नम्र विनंती करीत आहे. किंबहुना यासारख्या विषयावर मराठीत ज्ञान देणारे 'अर्थबोधपत्रिके'सारखे साधन दुसरे आहेच कुठे ? दुसरी नम्र सूचना ही की, काही विषयांवरचे लेख प्रसिद्ध झाल्यानंतर त्या विषयासंदर्भात पुढील घडामोडींचेही लेखन देत राहावे. डार्विनच्या उत्क्रांतीवादाला नाकारणाऱ्या 'इंटलिजन्ट डिझाइन'बाबत एक सविस्तर लेख या आधी आला होता. त्यामुळे विदेशात या विषयासंदर्भात पुढे काय झाले किंवा त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे याची उत्सुकता राहते. कृपया शक्य असल्यास या सूचनेचा विचार करावा. मराठी भाषेत अशी उत्तम ज्ञानदायी पत्रिका देत असल्याबद्दल पुनश्च एकदा आपले अभिनंदन. **पुरुषोत्तम रामकृष्ण रामदासी, पुणे**

'अर्थबोधपत्रिके'चा जुना अंक मी स्टेट बँकेच्या निंभा शाखेत (जिल्हा वर्धा) वाचला. तो वाचून आपल्या 'पत्रिके'चा वर्गणीदार होण्याची इच्छा झाली; इतका त्या अंकांचा प्रभाव पडला. **विनय चांगदे, खामला, नागपूर**

## एक विनंती...

वाचकांचा प्रतिसाद हा कोणत्याही लेखन-संपादन व्यवहारातील जितका आनंदाचा तितकाच प्रबोधक भाग असतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या अंतरंगासंदर्भात समाधान व्यक्त करणारी वाचकांची पत्रे ही उत्साह वाढविणारी अशीच असतात. परंतु त्याच्याच जोडीने, पत्रिकेकडून असणाऱ्या अपेक्षाही शब्दबद्ध करून पत्ररूपाने मांडल्यास अधिक संतोष होईल. -संपादक

# चीनमधील ग्राहक-क्रांती

'बदल' हा परवलीचा शब्द ठरलेल्या या माहितीयुगात विविध देशांमध्ये, अनेक क्षेत्रांमध्ये अनेकविध प्रकारचे बदल घडून आले. यात आशियाई देशांमधील बदलांचा उल्लेख विशेषत्वाने केला जातो. त्यात भारत व चीन या दोन देशांचाही समावेश अर्थातच आहे. या दोन्ही देशांमध्ये झालेले बदल हे बहुरंगी, बहुढंगी आहेत; ते आर्थिक-औद्योगिक आहेत तसेच राजकीयही. ते सामाजिक आहेत तसेच कौटुंबिकही. हे बदल अनेक अभ्यासकांनी आपल्या विषयाच्या अनुषंगाने टिपलेही आहेत. 'युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया' येथील समाजशास्त्राचे प्राध्यापक ॲमी हॅन्सर हे अशा अभ्यासकांमधील एक. गेल्या ३० वर्षांत चीनमध्ये झालेली 'ग्राहक-क्रांती' त्यांनी शब्दबद्ध केली आहे.

या बदलांचा वेध घेताना भारत व चीन यांच्यातील साधर्म्य वा वेगळेपणा हाही काही अभ्यासकांच्या तसेच सर्वसामान्यांच्या औत्सुक्याचा भाग राहिला आहे. ग्राहक-क्रांती हा विषयही याला अपवाद नसावा. ॲमी हॅन्सर यांनी मात्र आपले लक्ष चीनवरच केंद्रित केले आहे. असे असले तरी, गेल्या काही वर्षांत घडलेल्या भारतातील आर्थिक-सामाजिक घटनांच्या पार्श्वभूमीवर भारतीय ग्राहकांमध्ये झालेला बदल आपल्याला परिचित आहेच; तो आपण स्वतः अनुभवतोही आहोत. पण साम्यवादी पारंपरिक विचारसरणीच्या पार्श्वभूमीवर चीनमध्ये झालेली ग्राहक-क्रांती व भारतातील ग्राहकांमध्ये झालेले बदल हे एकसारखेच आहेत की वेगळे आहेत, या बदलांचे परिणाम समाजव्यवस्थेत कसे स्वीकारले जातात, हे आपल्याला या लेखावरून ताडून पाहता येईल.

आज वयाची पंचविशी पार केलेल्या बहुतेक सर्व चिनी नागरिकांनी हे बदलांचे युग अनुभवले आहे. १९८०च्या दशकात चीनमध्ये आर्थिक सुधारणांचे वारे वाहू लागले होते. चीनमधील नागरी जीवनाची सर्वच क्षेत्रे या वाऱ्यांच्या लहरींनी स्पर्शिली होती. याचा सर्वात मोठा दृष्य परिणाम 'उपभोगा'च्या (consumption) क्षेत्रावर झाला. कारण, गेल्या अडीच दशकांत चीनमधील गरिबी बऱ्याच प्रमाणात कमी झाली आणि त्या तुलनेत समृद्धी थोडी वाढली. साम्यवाद, समाजवाद यांच्या

अधिपत्याखालील आर्थिक व सामाजिक व्यवस्थेची जागा समाजवादाधिष्ठित बाजारपेठीय अर्थव्यवस्थेने (market socialism) घेतली. यामुळे एका बाजूला, काही प्रमाणात संपत्तीची निर्मिती झाली; तर, दुसऱ्या बाजूला आर्थिक विषमताही वाढली. उदाहरणार्थ, १९७८ ते २००२ या काळात चीनमधील दरडोई उत्पन्न सुमारे पाचपटीने वाढले; तसेच, तेथील आर्थिक विषमताही मोठ्या प्रमाणात वाढली. या पार्श्वभूमीवर, चीनमध्ये उभ्या राहात असलेल्या ग्राहकाधिष्ठित अर्थव्यवस्थेचे दोन परस्परविरोधी चेहरे पुढे येतात. एक म्हणजे ग्राहकोपयोगी वस्तूंची खरेदी करताना चीनमधील ग्राहकांना निवडीला स्वातंत्र्य व वाव मोठ्या प्रमाणावर मिळतो आहे; तर त्याच वेळी क्रयशक्ती असलेल्या नागरिकांवर अनेक बंधनेही येत आहेत. हा विरोधाभास जाणून घेण्यासाठी कालचक्र थोडे मागे फिरवण्याची गरज आहे.

## दुकानांमधील वर्गसंघर्ष

चीनमधील आर्थिक सुधारणांचे पर्व चालू होण्याआधी (१९७८पूर्वी) चीनच्या अर्थव्यवस्थेवर, बाजारपेठेवर सरकारचे व केंद्रीय नियोजनमंडळाचे नियंत्रण होते, सत्ताधारी साम्यवादी पक्षाचा अंकुश मंत्र्यांवर होता. तत्कालीन चिनी अर्थव्यवस्था ही पूर्णतः 'कमांड इकॉनॉमी' - 'नियंत्रित अर्थव्यवस्था' होती (अर्थशास्त्रीय परिभाषेत या व्यवस्थेला 'समाविष्ट अर्थव्यवस्था' असे म्हणण्यात येते). म्हणजे, कोणत्या वस्तूचे किती उत्पादन करायचे, तिचे वाटप कसे करायचे या बाबी सरकारच्या अधीन होत्या. या अशा पूर्णतः नियंत्रित, नियोजित अर्थव्यवस्थेत ग्राहकांना अनेक वस्तू मुबलक प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने या अर्थव्यवस्थेला 'शॉर्टेज इकॉनॉमी' - 'तुटवड्याची अर्थव्यवस्था' - असेही म्हटले जात होते. नागरी जीवनात हा तुटवडा सतत डोकावतही होता. तुटवड्यामुळे रेशनिंग आणि लांबच्या लांब रांगा यापायी नागरिक त्रस्त होतेच. त्यातच भर पडली ती सरकारच्या आणखीही एका धोरणाची. ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन कमी करून त्याऐवजी अवजड उद्योगांचा विकास करण्याचे धोरण त्या वेळी सरकारने आखले होते.

ग्राहकोपयोगी वस्तूंच्या तुटवड्यामुळे मोठ्या शहरांमधील नागरिकांनादेखील अनेक बारीकसारीक बाबींसाठी 'याचक' बनावे लागत होते. कामाच्या ठिकाणाहून मिळणाऱ्या वस्तू व सेवा यांवरच त्यांना अवलंबून राहावे लागत होते (उदाहरणार्थ, घर, रेशनची कुपन्स, हॉटेलमधील आरक्षण वा प्रवासासाठी तिकिटे इत्यादी). लोकसंख्येचा विस्तार आणि तुटवड्याची अर्थव्यवस्था यांमुळे रांगा आणि प्रतीक्षा यांत चिनी नागरिक

सतत अडकलेले होते. यांतून सुटका करण्याचा एक मार्ग तेथे प्रचलित होता; तो म्हणजे 'ग्वांक्झी'चा. 'ग्वांक्झी' म्हणजे आपल्या वैयक्तिक ओळखीचा, परस्परसंबंधांचा उपयोग कार्यालयीन वा इतर कामे करून घेण्यासाठी करायचा आणि आपली कामे पूर्ण झाल्याची परतफेडही 'ग्वांक्झी'नेच - म्हणजे मदत करणाऱ्याला मदत करूनच - करायची (पाहा - अर्थबोधपत्रिका, नोव्हेंबर २००४, पृष्ठ - १८). आजही चीनमध्ये 'ग्वांक्झी'ला महत्त्व आहे.

सांस्कृतिक क्रांतीच्या (१९६६ ते १९७६) काळात ग्राहकोपयोगी (उपभोगाच्या) वस्तूंच्या पुरवठ्यात आणखी कपात करण्यात आली होती. सोन्या-चांदीचे दागिने, सौंदर्यप्रसाधने, यांत्रिक खेळणी, पत्ते आणि पाश्चात्य धर्तीचा पेहराव यांची ('बुर्झ्वा' जीवनपद्धती असे संबोधून) दुकांनामधून हकालपट्टी करण्यात आली होती. एवढेच नव्हे तर कपड्यांचे रंगही निळे, पांढरे, हिरवे व राखाडी असे मोजकेच ठेवण्यात आले होते. दुकानांमधील विक्रीचे काउंटर हे वर्गसंघर्षाचे जणू एक 'संकेतस्थळ'च बनले होते. दुकानांमधील कर्मचारीवर्ग हा ग्राहकोपयोगी वस्तूंचा 'पहारेकरी' होता. त्यांच्या कामात म्हणजे वाटपात 'ग्वांक्झी'चा प्रभाव होताच, शिवाय ग्राहकाला 'सेवा' पुरविण्याऐवजी आपण ग्राहकावर 'उपकार' करीत आहोत अशी त्यांची भावना (व कृतीही) होती. आता मात्र यात हळूहळू बदल होत आहे.

**....आता ग्राहकांची निवड महत्त्वाची**

आर्थिक सुधारणांनंतर, विशेषत: अलीकडच्या काळात मात्र ही परिस्थिती पालटली असून चीनमधील ग्राहकोपयोगी वस्तूंची बाजारपेठ अनेकानेक उत्पादकांनी गजबजली आहे. अशी बाजारपेठ पाहणे व अशा वस्तूंची खरेदी करणे हा तेथील तरुण व मध्यमवयीन नागरिकांसाठी एक वेगळाच अनुभव आहे. उदाहरणार्थ, १९७८ ते १९८५ या काळात चीनमधील सायकलींचे उत्पादन ८० लाखांवरून ३ कोटी २० लाख एवढे वाढले. याच काळात टी.व्ही.चे उत्पादन ५ लाखांवरून १ कोटी ६० लाखांवर पोचले. या काळात नागरिकांची मिळकतही मोठ्या प्रमाणावर वाढली. १९७८ च्या तुलनेत २००२ मध्ये दरडोई उत्पन्न पाचपटीने वाढल्याचे दिसते. १९९०च्या दशकात मिळकतीचे प्रमाण वार्षिक ५ ते ६ टक्के या दराने वाढले. त्यामुळे चीनमधील नागरिकांच्या खिशात पैसा खुळखुळू लागला; त्याचबरोबरीने त्यांना थोडा मोकळा वेळही मिळू लागला. १९८० ते १९९१ या काळात बऱ्याच नागरिकांना दिवसाकाठी दोन ते चार तास रिकामा वेळ मिळू लागला असे एका अभ्यासकाने नोंदविले आहे.

अन्नपदार्थ, खाद्यान्न यांवर केल्या जाणाऱ्या खर्चाचे नागरिकांच्या एकंदर खर्चातील प्रमाण १९८५ ते २००१ या कालावधीदरम्यान ५४ टक्क्यांवरून ३८ टक्क्यांवर आले. तर, शिक्षण, मनोरंजन फुरसतीच्या वेळातील उपक्रम यांच्यावरील खर्चाचे एकंदर खर्चातील प्रमाण ८ टक्क्यांवरून वाढून १३ टक्क्यांवर गेले.

उपभोगाबाबत झालेल्या या वाढीचा अर्थ विविध पद्धतींनी लावता येतो. काही अभ्यासकांच्या मते, सरकारने नागरी जीवनातून आपले अंग काढून घेतल्याने नागरिकांना आपल्या जीवनावरील अधिकार प्राप्त झाला. त्यामुळे चीनमध्ये एक मोकळे समाजमन आकाराला येऊ शकेल, असा काहींचा होरा आहे. तिसरे, चीनमधील पूर्वीचे समाजमन राजकीयदृष्ट्या एवढे बंदिस्त होते की पाश्चात्य धर्तीचा पेहराव करणे म्हणजे चीनमध्ये 'आध्यात्मिक प्रदूषण' ('स्पिरिच्युअल पोल्यूशन') झाले असे समजण्यात येऊन त्यावर टीका करण्यात येत होती. आता चीनमधील शहरी जीवनाची ती एक निशाणी मानली जात आहे.

व्यक्तिगत आवडीनिवडीला उपभोगाच्या माध्यमातून वाव मिळणे हा चीनच्या नागरी जीवनातील आश्चर्यकारक असा एक बदल मानला जातो. परदेशांतील काही अभ्यासकांच्या मते, असा उपभोग वाढणे हे राजकीय सत्तेविरुद्ध नाराजी दर्शविण्याचे नागरिकांचे एक साधन झाले असण्याचीही शक्यता आहे. पूर्वी, चीनमध्ये सामुहिकतेला/समूहवादाला फार महत्त्व असल्याने व्यक्तीवादाला तेथे स्थान नव्हते. परंतु, अलीकडच्या काळात मात्र व्यक्तीवाद अस्पृश्य समजला जात नाही. त्यामुळे तेथील नागरिक आता डिस्को डान्स, परदेशी चित्रपट, पाश्चात्य खाद्यपदार्थ व पेहराव, टी.व्ही आणि इतर चैनीमौजेच्या बाबींचा उपभोग घेऊ लागले आहेत. आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे, साम्यवादाची स्थापना होण्याआधीच्या परंपरागत चालीरीती, विवाहाच्या पद्धती आणि लोकनृत्ये यांनाही तेथे आता नव्याने महत्त्व मिळू लागले आहे. काही चिनी नागरिकांच्या मते साम्यवादामुळे नागरिकांच्या दबलेल्या इच्छा व भावना या आता मोकळ्या होऊ लागल्या आहेत. स्त्रियांकडे बघण्याचा परंपरागत दृष्टिकोणही बदलू लागला आहे. जाहिरातीमधील स्त्रीदेहाचे प्रदर्शन वाढू लागले आहे. माओच्या काळात स्त्रियांच्या सशक्तपणाला महत्त्व होते तर अलीकडच्या काळात स्त्रियांचे सडसडीत, सडपातळ असणे महत्त्वाचे मानले जात आहे. स्त्रियाही आपले सौंदर्य वाढविण्यासाठी हरप्रकारे प्रयत्न करीत आहेत. २००४ मध्ये तेथे सौंदर्यस्पर्धाही आयोजित करण्यात आल्या होत्या. ग्राहकांसाठी नवनवीन उत्पादनांची बाजारपेठ विकसित होत असतानाच्या

या काळात तेथील कौटुंबिक जीवनावरही परिणाम होत आहेत. उदाहरणार्थ, कोणती व्यक्ती समाजात कशी वावरते, कोणकोणती उत्पादने कशा प्रकारे खरेदी करते यावर तिचे समाजातील स्थान ठरू लागले आहे. त्यामुळे थाटामाटात लग्न करण्याला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले आहे. शहरांमधील घरांमध्ये, विशेषतः नवविवाहितांच्या घरी, मायक्रोव्हेव, वॉशिंग मशीन अशी विविधप्रकारची उपकरणे, यंत्रे असली तर त्यांची गणना उच्चमध्यमवर्गात केली जावी हे ओघाने आलेच. अशा घरांमध्ये कम्प्युटर व मोटर हेही असणे क्रमप्राप्तच आहे. भारतात जशी सेलफोनची बाजारपेठ विस्तारली आहे तशीच बाजारपेठ तेथेही विस्तारत आहे. तेव्हा, 'ज्याची पैशाची थैली मोठी, त्याचा सेलफोन छोटा' (म्हणजे आधुनिक व महागडा) अशी समीकरणे आकाराला आली आहेत. दरम्यान, स्थावर मालमत्तेची (रियल इस्टेट) बाजारपेठ विस्तारत असताना पुरुषांनी मालमत्तेवर ताबा मिळविण्यास सुरुवात केली आहे, हे स्त्रियांच्या दृष्टीने अन्यायकारक ठरते आहे (संपूर्ण जगात स्थावर मालमत्तेवर, फार मोठ्या प्रमाणात पुरुषांचेच वर्चस्व आहे). आणखी एक परिणाम म्हणजे सायबर कॅफेमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले असून मुलांनी वेळ व पैसा कोठे नि कसा खर्च करावा याबाबतही वादचर्चा घडत आहेत. नागरिकांमध्ये खरेदीची मानसिकता आकारल्याच्या पार्श्वभूमीवर अनेक उद्योजक नफा मिळविण्यासाठी बनावट उत्पादने बाजारपेठेत आणत आहेत. यात अनेक ग्राहकांचे नुकसानही होत आहे. त्यामुळे ग्राहक चळवळही जोर धरण्याची चिन्हे दिसत आहेत.

समाजवादाधिष्ठित बाजारपेठीय अर्थव्यवस्थेमुळे विषमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे, हे बहुसंख्य अभ्यासक मान्य करतात. आर्थिक सुधारणांमुळे कोणत्या समाजगटाचा फायदा झाला हा विषय सध्या तेथे चर्चिला जात आहे. अर्थात, सुधारणांच्या आधीच्या कालखंडातही तेथे विषमता होतीच, पण तेव्हा लाखो नागरिक गरिबीच्या खाईतून बाहेर पडले होते हे वास्तवही विसरून चालणार नाही. मात्र अलीकडे, देशपातळीवर तसेच शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागांत मोठ्या प्रमाणात विषमता आढळते, यावर अभ्यासकांचे एकमत आहे. चीनमधील आर्थिक सुधारणांच्या बरोबरीनेच चिनी राजकारणातही उदारमतवाद तसेच खुलेपणा प्रस्थापित होईल, हा अभ्यासकांचा अंदाज मात्र साफ चुकल्याचे दिसते. जागतिकीकरणाच्या वावटळीने पारंपरिक साम्यवादी विचारसरणीची बंदिस्त आर्थिक चौकट ढिली बनवली असली तरी सत्ताकारणाची चौकट मात्र आजही पोलादीच आहे. *(संदर्भ - करंट हिस्टरि, सप्टेंबर २००५)* ✿✿

# 'जेन्डर बजेट'ची पूर्वतयारी

सहभागात्मक विकास नामक एक संकल्पना अलीकडील काही वर्षांत एकदम जोराने पुढे आली आहे. विकासाची सारी प्रक्रिया ज्यांच्यासाठी कार्यान्वित करावयाची त्या जनसमूहांच्या त्या प्रक्रियेबाबतच्या कल्पना, विकास या संकल्पनेची त्यांना अभिप्रेत असलेली व्याख्या, त्यांच्या आशा-अपेक्षा व उद्दिष्टे यांचे प्रतिबिंब विकासविषयक धोरणांच्या आखणी-निर्मितीत पुरेसे पडावे, ही भूमिका 'पार्टिसिपेटरी डेव्हलपमेन्ट'च्या या संकल्पनेमागे आहे. धोरणांच्या केवळ आखणीतच नव्हे तर, त्या धोरणांची व्यवहारात अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर त्यांच्या तामिलीची देखरेख तसेच परिणामांच्या मूल्यमापनातही संकल्पित लाभार्थींचा सहभाग असावा, असाही एक पदर या भूमिकेस आहे.

अर्थसंकल्पांसंदर्भातही आता हळूहळू याच प्रकारची भूमिका (आणि मानसिकताही) प्रतिष्ठित होताना दिसते. ज्या करदात्यांच्या पैशाचा विनियोग सरकार करीत असते त्या विनियोगाची रूपरेषा निश्चित करीत असताना करदात्यांच्या अपेक्षा-कल्पनांचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात पडणे अगत्याचे आहे, असा यामागील दृष्टिकोण आहे. अर्थसंकल्पाच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून ग्राहक, शेतकरी, उद्योजक, कामगार, व्यापारी, निर्यातदार यांसारख्या अर्थकारण तसेच समाजकारणातील विविध घटकांशी अर्थमंत्री जी चर्चा करतात तिच्यामागील कार्यकारणभाव हाच असतो. किंबहुना, आता तर समाजातील सर्वसामान्यांचाही सहभाग अर्थसंकल्पाच्या जडणघडणीत या ना त्या स्वरूपात असावा या हेतूने, खुल्या चर्चेद्वारे नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेणे, अर्थसंकल्पातील काही प्राधान्यक्रमांबाबत नागरिकांची मते अजमावणे यांसारखे उपक्रमही (तुरळक का होईना पण) अलीकडे साकारताना दिसतात.

'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट'च्या संकल्पनेतही अशाच प्रकारचा लोकसहभाग अपेक्षित आहे. अर्थसंकल्पात सुचविण्यात आलेल्या सरकारी खर्चविषयक विविध तरतूदींच्या लिंगनिविष्ट परिणामांची छाननी करण्यात दक्षिण आफ्रिकेत सेवाभावी-स्वयंसेवी संस्था

तसेच संशोधकांनी जो पुढाकार घेतला तो अशाच लोकसहभागाचा आविष्कार होता. अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या खर्चविषयक तरतूदींच्या लिंगसापेक्ष परिणामांची चिकित्सा करणे, हा अशा लोकसहभागाचा आद्य आविष्कार असला तरी अंतिमतः अर्थसंकल्पाच्या जडणघडणीतच महिलांचा वा महिला संघटनांच्या प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. 'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट' या संकल्पनेसंदर्भात जगभरात आज जिथे जिथे म्हणून मंथन चालू आहे त्या मंथनातून हाच सूर उमटताना ऐकू येतो. मात्र, अर्थसंकल्पाच्या लिंगनिविष्ट अशा चिकित्सेसाठी कोणत्याही स्वरूपातील लोकसहभाग हा अर्थपूर्ण ठरावा यासाठी अर्थसंकल्पाची रचना, त्यातील तपशीलांची मांडणी, आकडेवारीचे सादरीकरण, लाभार्थींचे विवरण, सरकारी योजना-उपक्रमांच्या परिणामांचा सांख्यिकी गोषवारा यांत काही सुधारणा, अनुकूल असे बदल मात्र अनिवार्य ठरतात. त्यासाठी काही विशिष्ट पूर्वतयारीही आवश्यक भासते.

सरकारच्या धोरणविषयक बाबी तसेच वित्तीय व्यवहारांना चिकटलेले 'जेन्डर'चे परिमाण हे सर्व बाबतींत केंद्रस्थानी ठेवणे, ते तसे केंद्रस्थानी ठेवले जावे याबाबतची मानसिकता सरकारी यंत्रणेत सर्व स्तरांवर निर्माण करणे व ती जाणीवपूर्वक जोपासणे ही या प्रक्रियेची आद्य पूर्वअट ठरते. सरकारने आखलेल्या वा राबविलेल्या विविध धोरणांचे परिणाम, अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेल्या खर्चविषयक नानाविध तरतूदींचे वास्तवातील लाभ हे समाजातील घटकांना लिंगनिरपेक्ष पद्धतीने, समानपणे उपभोगावयास मिळतात हेच सर्वसाधारण गृहीतक प्रशासनात सर्वत्र रुजलेले आढळते. करविषयक एखादा प्रस्ताव नोकरदारांवर सर्वत्र सर्वसाधारणपणे एकाच प्रकारचा प्रभाव घडवून आणेल ही भूमिका तात्त्विकदृष्ट्या तर्कशुद्ध असली तरी वास्तवात ती नोकरदार व्यक्ती ही स्त्री आहे की पुरुष यावर त्या प्रस्तावाचे व्यवहारातील परिणाम वेगवेगळे होताना दिसतात. म्हणूनच, धोरणांची आखणी करीत असताना त्यांचे व्यवहारातील परिणाम हे स्त्री तसेच पुरुषांवर वेगवेगळ्या प्रकारे होणे हे संभवनीय आहे, याबाबतची संवेदनशीलता धोरणकर्त्यांमध्ये तसेच त्या धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या नोकरशाही यंत्रणेत बाणविणे अगत्याचे ठरते.

हे शक्य व्हावे यासाठी लिंगनिविष्ट विचारप्रणाली, विश्लेषण पद्धती यांची संस्कृतीच कामकाजात मुरावी लागते. त्यासाठी -

१. 'जेन्डर'विषयक सर्व पैलूंबाबत आवश्यक ती जागृती निर्माण करणे, जोपासणे

२. विविध सरकारी विभाग तसेच नोकरशाहीतील वेगवेगळ्या स्तरांवर संवाद व सुसूत्रीकरण प्रस्थापित करणे

३. लिंगनिविष्ट विषमता व तिचे सुप्त तसेच प्रगट पैलू शोधण्याबाबतची दक्षता निर्माण करणे

४. लिंगसापेक्ष विषमतेची व्यवहारातील व्यामिश्रता जोखून धोरण तसेच खर्चविषयक उद्दिष्टे ठरविताना या विषमतेचे उचित भान राखले जाईल याबाबत काळजी घेणे

५. धोरणे तसेच सरकारी खर्चविषयक उद्दिष्टांच्या फलप्राप्तीची लिंगनिहाय चिकित्सा करण्यासाठी अनुरूप अशी विश्लेषणाची साधने तयार करणे, अशा विविध आघाड्यांवर सक्रिय बनणे हे अशा पूर्वतयारीचे अत्यावश्यक अंग बनते.

कोणतेही नवीन धोरण अथवा अर्थसंकल्पात समाविष्ट करावयाची सरकारी खर्चविषयक एखादी नवीन योजना वा करप्रस्ताव तयार करताना, म्हणूनच, काही बाबींचे पूर्वाध्ययन होणे गरजेचे असते. त्या बाबी अशा -

१. अर्थ तसेच समाजकारणाच्या विविध प्रांतांत स्त्री तसेच पुरुषांची विद्यमान तौलनिक स्थिती कशा प्रकारची आहे, याचा धांडोळा घेणे.

२. या विविध क्षेत्रांत जाणविणाऱ्या समस्यांचे लिंगनिविष्ट शोधन तसेच निदान करणे. या समस्यांचे निराकरण करण्यासंदर्भात प्रचलित सरकारी धोरणांचे आलोडन करणे. त्या समस्यांच्या प्रकाशात धोरणविषयक बाबींची चिकित्सा हाती घेणे. दोहोंतील तफावत/विसंगती शोधणे.

३. या विसंगती ध्यानात घेऊन (विसंगती असल्यास) समस्यांच्या समाधानकारक निराकरणासाठी प्रचलित धोरणांत आवश्यक भासणाऱ्या सुधारणांचे स्वरूप निश्चित करणे.

४. अशा सुधारित धोरणांच्या, लिंगनिविष्ट तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी पुरेशा निधीची उपलब्धता अर्थसंकल्पाद्वारे करण्यात आलेली आहे अथवा नाही याचा धांडोळा घेणे. निधीवाटपात अनुरूप असे बदल घडवून आणण्याबाबतच्या दिशा स्पष्ट करणे. हे शक्य व्हावे यासाठी खर्चविषयक प्रस्तावित तरतूदींच्या लाभार्थींचे विवरण लिंगनिहाय सादर केले जाणे हे अनिवार्य ठरते.

अर्थसंकल्प तसेच एखाद्या सरकारी उपक्रमाचे 'जेन्डर सेन्सेटिव्ह' विश्लेषण हाती घेता यावे यासाठी अशा प्रकारची पूर्वतयारी झाल्यानंतर मुख्य भाग उरतो तो प्रत्यक्ष विश्लेषणाचा. बऱ्याच वेळा असे होते की धोरणविषयक दस्तावेजात प्रकल्पाच्या 'टार्गेट' लाभार्थींचे संख्यात्मक विवरण हे लिंगनिहाय दिलेले आढळून येत नाही. अमुक योजनेचा लाभ अमुक समाजस्तरातील एकूण अमुक इतक्या घटकांना मिळेल, अशा प्रकारचे एकत्रित सादरीकरण करण्याकडेच एकंदर प्रवृत्ती असते. अनेक ठिकाणी अपेक्षित लाभार्थींचे विवरण हे त्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीनुसार सादर केलेले आढळते. मात्र, त्या विवक्षित सामाजिक गटातील एकंदर लाभार्थींमध्ये स्त्रिया तसेच मुलींचे प्रमाण किती आहे, याचा तपशील मात्र दिलेला नसतो. परिणामी, अर्थसंकल्प अथवा कोणत्याही सरकारी खर्चविषयक बाबींच्या लिंगसापेक्ष विश्लेषणाच्या शक्यताच खुंटतात. तीच बाब अर्थसंकल्पातील प्रस्तावित तरतूदींच्या वास्तवातील लिंगनिविष्ट परिणामांच्या चिकित्सेची. त्याचसाठी अर्थसंकल्पीय तरतूदींच्या प्रत्यक्षातील लाभार्थींचे लिंगनिहाय विवरण सादर केले जाईल, याबाबतची दक्षता घेतली जाणे अगत्याचे ठरते. एकंदरीतच विचार करता अर्थसंकल्पातील कोणत्याही खर्च तसेच करविषयक प्रस्तावांच्या लाभार्थींचे लिंगनिहाय विवरण समोर येणे, हे 'जेन्डर बजेट'ची संकल्पना मूर्त होण्याची एक मूलभूत अशी पूर्वअट ठरते.

अर्थसंकल्पीय तरतूदींचे, त्या तरतूदींच्या वास्तवातील परिणामांचे असे लिंगनिहाय विश्लेषण हे गरजेनुसार कोणत्याही स्तरावर करणे हे शक्य असते. उपलब्ध वेळ, साधनसामग्री व मुख्य म्हणजे अभ्यासाचे उद्दिष्ट यानुसार अशा विश्लेषणाचा स्तर व विस्तार ठरविता येतो. हे असे स्तर खालीलप्रमाणे -

१. संपूर्ण अर्थसंकल्पाचेच लिंगनिविष्ट अध्ययन

२. एखाद्या विविक्षित सरकारी विभागाच्या अथवा सरकारी योजना वा प्रकल्पाच्या खर्चाचे लिंगनिहाय विश्लेषण

३. सरकारने प्रवर्तित केलेल्या एखाद्या नवीन उपक्रमाचे विश्लेषण

४. अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आलेल्या एखाद्याच करविषयक अथवा फी बाबतच्या तरतूदींचे लिंगनिविष्ट अध्ययन

५. करप्रणालीतील बदलांच्या परिणामांचे लिंगसापेक्ष विवरण व विश्लेषण

विविध देशांत 'जेन्डर बजेट' या संकल्पनेचा व्यवहारात आजवर झालेला आविष्कार काय सांगतो, हा आता अभ्यासाचा पुढचा प्रांत. *(संदर्भ - इंटरनेट)* ✿✿

## महिला - १

# सातत्यपूर्ण विकासासाठी हवे स्त्रियांच्या हाती अधिकार

"Woman became the embodiment of the biological function, the image of nature, the subjugation of which constituted that civilization's title to fame. For millennia men dreamed of acquiring absolute mastery over nature, of converting the cosmos into one immense hunting ground. It was to this that the idea of man was geared in a male-dominated society. This was the significance of reason, his proudest boast." (Horkheimer and Adorno)

विश्वातील ढासळत्या पर्यावरणामुळे आज केवळ पर्यावरणवादीच अधिक सतर्क आणि सक्रिय झालेले नाहीत तर ही धोक्याची घंटा आता सामान्यांनाही ऐकू येऊ लागल्याने तेही याबाबत जागरूक होत आहेत. पर्यावरण रक्षणासाठी जगभर ज्या चळवळी होत आहेत आणि ज्या प्रमाणात त्यांना सामान्यांचा जसा प्रतिसाद मिळत आहे, त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. पर्यावरण रक्षणासाठी केल्या जाणाऱ्या या

*औद्योगिकीकरणानंतरच्या काळात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने आकाराला आलेल्या आजच्या यंत्रयुगात माणसाने विस्मयकारक प्रगती केली आहे. पण या प्रगतीसाठी त्याने निसर्गाची फार मोठी किंमत चुकवली आहे. पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास पाहता, 'माणसा माणसा, कधी होशील रे माणूस,' असा प्रश्न सहजपणे विचारला जाऊ लागला आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही अभ्यासकांनी सातत्यपूर्ण विकास ही संकल्पना पुढे आणली. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रियांच्या हाती अधिक अधिकार असणे हे गरजेचे वाटू लागले आहे. येऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या (८ मार्च) पार्श्वभूमीवर या दिशेची ओळख करून घेऊया, या व पुढील लेखात.....*

चळवळींचे उद्देश पर्यावरणाचा समतोल राखणे, त्यातील वैविध्य जपणे आणि मानवाच्या विकासात एका मर्यादेपर्यंतच नैसर्गिक घटकांचा उपयोग करून घेणे हा आहे. पण पर्यावरण रक्षकांची जबाबदारी एवढ्यावरच संपते का ?

१९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जगभर साजर केले गेले. या नंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय अधिवेशनांमधून महिलांच्या सक्षमीकरणाकरिता अनेक विकास कार्यक्रम तयार केले गेले, राबवले गेले. विशेष म्हणजे या विकास कार्यक्रमांत महिलांच्या सक्षमीकरणाकरिता इतर मुद्यांबरोबर एक महत्त्वाचा मुद्दा चर्चिला गेला आणि तो म्हणजे पर्यावरणाचा! पर्यावरणाचा आणि स्त्रियांचा संबंध काय, असा प्रश्न प्रथमदर्शनी सर्वांनाच पडेल. पण वस्तुस्थिती अशी आहे की पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी आजवर बऱ्याच प्रमाणात स्त्रियांनी पार पाडली आहे. स्वयंपाकाच्या चुलीसाठी लाकूडफाटा गोळा करताना, मैलोन्‌मैल पायपीट करून पाणी आणताना, स्त्रिया पर्यावरणावरच पूर्णपणे अवलंबून होत्या. त्यामुळे पर्यावरणाच्या हानीची झळ सर्वप्रथम स्त्रियांना बसली. म्हणूनच चंडीप्रसाद भट आणि सुंदरलाल बहुगुणा यांनी केलेल्या 'चिपको' आंदोलनात जास्तीत जास्त सहभाग स्त्रियांचा होता. परंतु, पर्यावरणाचे आणि स्त्रीचे नाते येथवरच थांबत नाही. ते अधिक आंतरिक जिव्हाळ्याचे नाते आहे. स्त्री आणि पर्यावरण यांच्यातील नात्याने अलीकडे काही जीवशास्त्रज्ञांचे आणि सामाजिक विचारवंतांचे लक्ष वेधून घेतले आहे. सातत्यशील विकासासाठी असलेला पर्यावरण संवर्धनाचा मार्ग स्त्रियांच्या विकासातून जातो असे त्यांचे म्हणणे आहे. ही त्यांची भूमिका 'इकोफेमिनिझम'मधून पुढे आली आहे.

माणूस हा निसर्गाचा भाग आहे. निसर्गात जसे अन्य प्राणी, पशू-पक्षी आणि वृक्षराजी आहेत, त्याप्रमाणेच माणसाचे अस्तित्व आहे. निसर्गाच्या कुशीतूनच माणूस जन्म घेतो. म्हणूनच आपण निसर्गाला 'मदर नेचर' म्हणतो. निसर्गाच्या अंगाखांद्यावर तो वाढतो, मोठा होतो. मात्र मोठे झाल्यावर त्याचे ऋण मान्य करण्याऐवजी तो निसर्गाच्याच जीवावर उठतो. माणूस स्वतःला सर्वश्रेष्ठ समजतो आणि निसर्गातील अनेक घटकांचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी करून घेतो. खरे तर, माणूसच सर्वश्रेष्ठ आहे, असे नव्हे. निसर्गाच्या मूळ रचनेत आपल्याला ही उच्चनीचता कुठेही आढळत नाही. ही रचना चक्राकार आहे, ती परस्परावलंबी आहे. निसर्गातील प्रत्येक घटक एका विशिष्ट पातळीवर आहे आणि तो इतर घटकांशी विशिष्ट कार्यकारणभावाने जोडला गेला आहे. निसर्गात असे परस्परनातेसंबंधांचे जाळे आहे. पण मानवाने स्वतःचा भौतिक विकास साधताना निसर्गावर व त्यातील वैविध्यावर कुरघोडी केली आणि त्यातील काही घटकांचे अस्तित्व संपुष्टात आणले. निसर्गाने हे अत्याचार मूकपणे सहन केले. परिणामी पर्यावरणातील जैववैविध्य आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

निसर्गाबरोबरची ही अन्यायकारक वागणूक मानवी समाजातही प्रतिबिंबित झाली आहे. निसर्गाने जन्माला घालताना स्त्री आणि पुरुष यांना समान दर्जा दिला. किंबहुना स्वतःची सृजनाची जबाबदारी स्त्रीकडे सोपवली. मुलाला जन्म देणे, त्याचे पालनपोषण करणे, त्याला वेळोवेळी मानसिक आधार देणे ही कामे स्त्री करते. त्याचबरोबर कुटुंबाची भावनिक गरजही प्रामुख्याने स्त्री पूर्ण करते. तिच्या नैसर्गिक जडणघडणीतून ती सभोवतालच्या निसर्गाकडे पाहते तेव्हा तिच्या मनात शोषणाचा विचार येत नाही तर त्याचे संवर्धन तिला भावते. पण पुरुष मात्र तिचे हे ऋण मान्य न करता तिच्यावर अधिकार गाजवतो. कदाचित शारीरिकदृष्ट्या ती थोडी कमजोर असल्याने पुरुषांना हे अधिकार गाजविता आले असावेत. पुरुषाने केलेले हे अत्याचार स्त्रीने मूकपणे सहन केले (त्याचाच एक परिणाम म्हणजे मुलींच्या भ्रूणहत्या मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्या. त्याविरुद्ध आज नव्याने एखादी चळवळ हाती घेण्याची वेळ आली आहे).

पुरुष कितीही मोठा झाला किंवा त्याने अगदी जग जिंकले तरी भावनिकदृष्ट्या तो स्त्रीवरच अवलंबून असतो आणि पुरुषाला याची जाणीवही असते. निसर्गतःच स्त्री मानसिकदृष्ट्या स्वयंपूर्ण आहे आणि पुरुषाचे अस्तित्व स्त्रीवर अवलंबून आहे, ही गोष्ट पुरुष सहन करू शकत नाही. त्यामुळेच आजच्या काळातील स्त्रियांवरील अत्याचार, त्यांची अश्लील छायाचित्रे रंगविण्याचा प्रकार, त्यांचा लैंगिक छळ या सर्व कृती, स्त्रिया आपल्यावर वर्चस्व प्रस्थापित करतील, आपले अस्तित्व कमी लेखतील, या पुरुषांच्या आंतरिक असुरक्षेतून आणि भीतीतून जन्माला आल्या असाव्यात असे संशोधकांचे म्हणणे आहे. थोडक्यात जो न्याय (अन्याय) पुरुष निसर्गाला देतो, त्याच पारड्यात स्त्रीलाही जोखतो.

औद्योगिक क्रांतीनंतर मानवाने वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगती केली खरी, परंतु त्यापायी त्याने नैसर्गिक मूल्यांची पायमल्ली केली. विज्ञानातील शोधामुळे सगळे विश्वच कवेत घेण्याची उमेद माणसात निर्माण झाली आणि त्यासाठी निसर्गाने त्याला घालून दिलेली बंधने तो हेतूपुरस्सर विसरला. औद्योगिक क्रांतीनंतर समाजाची नव्याने जडणघडण होताना सगळा कर्तेपणा पुरुषाने स्वतःकडे घेतला. आणि आधीच पुरुष-प्रधान समाजव्यवस्था असलेल्या समाजात पुरुषांनी स्वतःचे महत्त्व आणखी वाढवून ठेवले. पुरुषप्रधान समाजाने स्वतःच्या स्वार्थापायी निसर्गाला आणि स्त्रीला दोघांना वेठीला धरले. अशा रीतीने निसर्गाचा आणि स्त्रियांचा ऱ्हास एकाचवेळी सुरू

झाला आणि त्याला कारणीभूत ठरली पुरुषी मानसिकता. आज बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पर्यावरणवादी चळवळींनी मूळ धरले आहे. खालावलेल्या पर्यावरणाचे संवर्धन करणे, त्याचे संतुलन राखणे, त्यातील वैविध्य जपणे - पर्यावरणातील असंख्य घटक आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे अनेक परिसंस्था (Ecosystems) धोक्यात आल्या आहेत - ही आव्हाने तर पर्यावरणवाद्यांसमोर आहेतच, परंतु, पर्यावरणाच्या कक्षेत राहून मानवाचा विकास साधण्याचे कठीण आव्हान त्यांच्यापुढे आहे. मानवी जीवन आणि पर्यावरण यांच्या संबंधांचा नव्याने अभ्यास करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. या संबंधाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला 'सामाजिक पर्यावरण' असे नाव आहे. बहुतांश पर्यावरणवाद्यांचे देणे-घेणे माणूस सोडून पर्यावरणातील इतर घटकांशी असते. त्यांनी आज त्यांच्या पर्यावरणाच्या चळवळीत स्त्रीवादी दृष्टिकोण अंगिकारणे आवश्यक आहे. कारण, जोपर्यंत स्त्रियांना समाजात दुय्यम वागणूक मिळते आहे, त्यांच्यावर अन्याय आणि अत्याचार होत आहेत, तोपर्यंत त्यांची ही चळवळ यशस्वी होणार नाही.

स्त्रीला समाजात मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीचे कारण तिचे निसर्गाशी असलेले नाते आहे. निसर्गावरील अन्याय आणि स्त्रीवरील अन्याय यांचे फार जवळचे लागेबांधे आहेत. आणि हाच 'इकोफेमिनिझम'चा मूलाधार आहे. त्यामुळे कुठलीही पर्यावरणवादी चळवळ यशस्वी व्हायची असेल तर, त्याकडे केवळ सामाजिक पर्यावरणाच्या अंगाने पाहून उपयोगी नाही तर, त्याला 'इकोफेमिनिझम'ची जोडही द्यायला हवी (पर्यावरणाच्या विकासाबरोबरच पर्यावरणवाद्यांना मानवाचा विकासही साधायचा आहे. मानवाचा विकास स्त्रियांच्या विकासापाशी येऊन थांबतो. कारण, मानवाचा विकास म्हणजे समाजातील शेवटच्या घटकाचा विकास आणि आजच्या घडीला समाजातील शेवटचा घटक स्त्री आहे). 'इकोफेमिनिझम'विना सामाजिक पर्यावरणाची धार बोथट होते. कारण, 'इकोफेमिनिझम' सामाजिक पर्यावरणशास्त्राला पर्यावरण आणि स्त्रीवाद यांतील संबंध समजावून देण्यास मदत करते.

'इकोफेमिनिझम'ची चळवळ काही प्रमुख तत्वांवर उभी आहे.

१) औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणावर होणारा अन्याय आणि स्त्रियांवर होणारा अन्याय यांचा परस्परसंबंध आहे. कारण, स्त्रिया पर्यावरणाच्या अधिक जवळ आहेत. २) पृथ्वीवरील जीवन हे परस्परसंबंधांनी विणलेले जाळे आहे. त्यात उच्चनीच अशी उतरंड नाही. पर्यावरणातील आणि मानवी समाजातील उतरंड मानवनिर्मित आहे.

३) संतुलित आणि परिपूर्ण पर्यावरण संस्थेमध्ये मानव आणि मानवेतर घटक यांची जपणूक व्हायला हवी. तरच पर्यावरणातील वैविध्याचे जतन होईल. पर्यावरणीयदृष्ट्या वैविध्याचा नाश हा पर्यावरण प्रदूषणाइतकाच हानीकारक आहे. ४) आपली संस्कृती (जीवनशैली) ही निसर्गाला अनुरु प हवी. निसर्ग आणि संस्कृती या वेगवेगळ्या संकल्पना नसून एकच आहेत. त्यामुळे यापुढे मानवी समाजाची जडणघडण होताना ती स्त्रीवाद आणि पर्यावरण यांच्या आधारे व्हायला हवी.

स्त्रीचे आणि निसर्गाचे नाते किंवा स्त्रीचे, मानव आणि निसर्ग यांच्यातील दुव्याचे नाते लक्षात आल्याने स्त्रीवादी चळवळीला आणखी नव्या दिशा मिळाल्या आहेत. औद्योगिकरणाच्या रेट्यात माणसाला नवीन जीवनशैलीचा आधार घेणे भाग आहे. स्त्रीवादी चळवळींचे म्हणणे आहे की, ही जीवनशैली ठरविण्याच्या प्रक्रियेत स्त्रियांना सहभागी करून घ्यायला हवे. त्यामुळे ज्या तत्त्वांवर भावी समाजाची संस्कृती ठरणार आहे, ती संस्कृती कशी असावी किंवा कशी नसावी या निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना सहभागी होता येईल (बंधनांना झुगारून देणे आणि स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करणे, ही पुरुषत्वाची लक्षणे आहेत. पण पुरुषाला त्याच्या मर्यादांची जाणीव करून देण्याचे काम स्त्री करते. त्यामुळे विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन जर पुरुष निसर्गावर अतिक्रमण करत असेल तर त्याला रोखण्याचे काम फक्त स्त्रीच करू शकते. त्यामुळे सांस्कृतिक जडणघडणीचे हे काम स्त्री चांगल्या प्रकारे करू शकेल). काही स्त्रीवाद्यांनी स्त्री आणि निसर्ग यांचे नाते आध्यात्मिकता आणि जाणीवेशी जोडले आहे तर पुरुषाचे नाते तार्किकतेशी जोडले आहे.

'पर्यावरणाचा सातत्यपूर्ण आणि परिपूर्ण विकास साध्य करायचा असेल तर, त्यासाठी मानवी समाजात स्त्री-पुरुष समानतेवर आधारलेली समाजव्यवस्था हवी,' ही 'इकोफेमिनिझम'ने मांडलेली भूमिका आता सर्वमान्य होत आहे. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमधून त्यावर विचारविनिमयही चालू आहे. 'बीजिंग डिक्लरेशन ॲन्ड प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन' (१९९५), 'वर्ल्ड समिट ऑन सस्टेनेबल डिव्हलपमेंट' (२००२), 'युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्रॅम' यांसारख्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनांमधून पर्यावरण आणि महिलांचा विकास केंद्रस्थानी ठेवून बऱ्याच योजना आणि कृती कर्यक्रम राबविले गेले. या योजनांचे आणि कृती-कार्यक्रमांचे फलित काय? तर, १)पर्यावरणसंबंधी धोरण ठरविताना निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला. मुख्य

*(पान ३७ वर पाहावे)*

# समानतेच्या युगात ग्रामीण स्त्रियांचे स्थान कुठे ?

बीजिंग येथे १९९५मध्ये झालेल्या स्त्रियांच्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनाला नुकतेच एक दशक पूर्ण झाले. १९९५ मध्ये स्त्रियांच्या विविध प्रश्नांसंबंधी कृती करण्यासाठी एक मंचही ('बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन' - BPFA) स्थापन करण्यात आला होता. यानंतरच्या काळात अनेक देशांनी या अधिवेशनातील स्त्री-पुरु ष समानता, स्त्रियांवर होणारे अन्याय-अत्याचार व इतरही काही मुद्यांप्रती आपली बांधिलकी असल्याचे मान्यही केले होते. मात्र, या गेल्या दहा वर्षांच्या काळात जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे अनेक समीकरणे बदलली, नवीन आव्हाने पुढे आली. विशेषत:, स्त्री-पुरुष समानता समाजात मान्य होणे व अंगवळणी पडणे किंवा स्त्रियांच्या क्षमतांचा विकास होणे, त्यांना विविध अधिकार मिळून त्यांचा अवलंब करता येणे (empowerment) याबाबत काही प्रश्न प्रकर्षाने पुढे आले. स्त्री-जगतही पुन्हा एकसंध नाही. त्यातील शहरी व ग्रामीण हा फरकही ठसठशीत आहे. तेव्हा देशोदेशींच्या ग्रामीण भागातील महिलांची या संदर्भातील स्थिती काय आहे, त्यांच्यापुढे कोणते प्रश्न आहेत, त्या संदर्भात काय करणे शक्य आहे, याबाबत ऊहापोह करणारा एक लेख संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'अन्न व कृषी संघटने'ने (Food and Agricultural Organization - FAO) प्रसिद्ध केला आहे. ग्रामीण भागातील महिलांना समानतेच्या, अर्थकारणाच्या प्रवाहात सामावून घेणे कसे शक्य होऊ शकते, ते या माहितीच्या आधारे जाणून घेता येईल. भारत हा कृषीप्रधान व खेड्यांचा देश आहे असे नेहमीच म्हटले जाते. त्यामुळे भारतासंदर्भात हा विषय गांभिर्याने घ्यावा असाच आहे. त्यातच येऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय महिलादिनाच्या (८ मार्च) संदर्भात त्याचे महत्त्व अधिक आहे.

शेतीक्षेत्रातील सातत्यपूर्ण विकास तसेच ग्रामविकास या दोहोंचा विचार करता ग्रामीण भागातील स्त्रियांच्या हाती अनेक अधिकार असण्याची गरज आज अधिकच जाणवते आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवर 'मिलेनियम डिव्हलपमेंट गोल्स' (सहस्रकाची विकास उद्दिष्टे) ठरविण्यात आली असून त्यातही ही निकड स्पष्ट करण्यात आली आहे. गेल्या दशकात, जागतिकीकरणामुळे देशोदेशींच्या अर्थकारणाला

आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराला जागतिक परिमाण लाभले; तसेच अनेकविध क्षेत्रांतील फायदे-तोटेही विविध माध्यमांद्वारे आपल्यासमोर आले आहेत. या संदर्भात अर्थव्यवहार बळकट करण्यासाठी अनेक धोरणे ठरविताना काही सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले असे मत काही अभ्यासकांनी मांडले आहे. स्त्री-पुरुषांमधील असमानता दर्शविणाऱ्या काही पद्धती, काही कायदे आजही तसेच राहिले आहेत. अशा काही बाबींचा जागतिक पातळीवरील आढावा व त्यावर उपाययोजना म्हणून 'अन्न व कृषी संघटने'ने केलेले प्रयत्न या लेखात मांडण्यात आले आहेत. याच्या आधारे आपापल्या परिसरांत चालू असलेल्या अशा सामाजिक कार्यांबाबत आपल्याला अधिक सजग होता येईल.

**जागतिकीकरण**

जागतिकीकरणामुळे होणारे अतिरेकी व्यापारीकरण, उत्पादनांची जागतिक पातळीवरील साखळी निर्माण होणे (ग्लोबल कमॉडिटी चेन्स), शेतीक्षेत्रातूनही जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करण्यापेक्षा निर्यातीभिमुख आणि नफा मिळवून देणारी पिके घेण्यावर दिला जाणारा भर इत्यादी बाबींद्वारे या गुंतागुंतीच्या प्रक्रियेचा फार मोठा परिणाम शेतीक्षेत्रावर झालेला दिसून येतो. हा परिणाम स्त्री व पुरुष असा दोघांवरही होत असला तरी ग्रामीण भागांतील स्त्रियांवर तो विशेषेकरून होऊ शकतो. उदाहरणार्थ, जेव्हा नगदी पिके घेण्याकडे कल वाढतो तेव्हा ग्रामीण भागांतील स्त्रियांचे जमिनी वा त्यांद्वारे मिळणारे उत्पन्न यांवरील मुळातच अल्प असलेले उरलेसुरले नियंत्रण संपुष्टात येण्याचा धोका संभवतो. त्यातच खाजगीकरणामुळे उत्पादनाची साधने, मालमत्ता, नानाविध सेवा व माहितीचा साठा (परंपरागत ज्ञान) इत्यादींचे ग्रामीण स्त्रीला आजवर मिळत आलेले लाभ, या सुविधांप्रती तिला आजपर्यंत खुला असलेला 'ॲक्सेस' खंडित होण्याचा धोकाही अलीकडे संभवतो.

यासंदर्भातील त्रुटी वा आव्हाने यांचा विचार करताना असे लक्षात येते की, कोणत्याही प्रकारच्या भेदाभेदांना थारा देण्यात येऊ नये असे म्हटले गेले असले तरी एकंदरीत पाहता लिंगसापेक्ष तसेच सामाजिक व आर्थिक विषमता वाढलेली दिसते. काही थोड्या गटसमूहांनाच जागतिकीकरणाचा फायदे उपभोगायला मिळालेले आहेत. आर्थिक मुद्यांना प्राधान्य देताना सामाजिक मुद्दे पिछाडीवर राहणार नाहीत याची काळजी घेण्याची, तसेच, जागतिकीकरणामुळे जगभरातील स्त्री-पुरुषांवर होणारे सामाजिक-सांस्कृतिक परिणाम विचारात घेण्याची गरज आहे, असे आता जाणवू लागले आहे. 'अन्न व कृषी संघटने'ने कृषी उत्पादनांसंबंधीचा व्यापार, कृषीक्षेत्रातील कायदे आणि

लिंगभेद, छोट्या प्रमाणावर शेती करणाऱ्यांचे होणारे व्यापारीकरण व त्यातील स्त्री-पुरुष विषमता इत्यादीविषयांचा अभ्यास केला. जनगणना तसेच विविध सर्वेक्षणांमधून पुढे आलेली या संबंधीची माहिती विविध देशांच्या सरकारांना उपलब्ध व्हावी यासाठी सर्वतोपरि साहाय्य करण्याचे कामही या संघटनेने केले.

## जमीन, मालमत्ता आणि वंशपरंपरेने मिळणारे अधिकार

एखाद्या देशाच्या घटनेनुसार स्त्री-पुरुषांना समान अधिकार देण्यात आलेले असले तरी प्रत्यक्षात असे आढळते की परंपरागत रीतीरिवाजांप्रमाणे ग्रामीण भागांतील महिलांना जमिनींचे मालकी हक्क मिळत नाहीत. त्यामुळे निर्णयप्रक्रियेतील त्यांचे स्थान कमी महत्त्वाचे समजले जाते. या संघटनेने असे निदर्शनास आणले आहे की, सातत्यशील विकासाकडे वाटचाल करायची असेल तर पर्यावरणाचा, परिसरविज्ञानाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी जमिनीचा कस सुरक्षित राखून करण्यात येणारी शेती आणि ग्रामीण विकास हे उद्दिष्ट नजरेसमोर असणे गरजेचे आहे. हे ध्येय गाठायचे असेल तर स्थावर मालमत्तेवरील पुरुषी पकड घट्ट करणाऱ्या कायद्यांचा फेरविचार करायला हवा. स्त्री-पुरुष समानतेसाठी जमिनींबाबतचे, मालमत्ताविषयक अधिकार स्त्रियांना मिळण्याबरोबरच त्यासाठी त्यांना कायद्याचे ज्ञान मिळेल अशा संधी निर्माण करणे हे गरजेचे आहे.

या संदर्भात, संघटनेने दक्षिण आफ्रिकेतील अभ्यासाला मदत केली. त्या वेळी जमीन, पाणी व अन्य नैसर्गिक साधनस्रोतांवर स्त्रियांचा अधिकार कशाप्रकारे नाही व तो असावा यासाठी काय उपाययोजना करता येईल, या संदर्भात काही दस्तावेज तयार केले. 'अन्न व कृषी संघटना, 'कृषीविकास आंतरराष्ट्रीय निधी' आणि 'इंटरनॅशनल लँड कोॲलिशन' यांनी संयुक्तरित्या काही मोजक्या देशांमधील स्त्रियांच्या दर्जाविषयीचा अभ्यास केला. स्त्री-पुरुष समानतेसाठी असलेल्या 'द कन्व्हेंशन ऑन द एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रिमिनेशन'च्या (CEDAW) कलमांप्रमाणे स्त्रियांचा दर्जा आहे किंवा कसे हे तपासण्यात आले. त्या वेळी असे आढळले की, मोरोक्कोने आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवाधिकार १९९२ पासून मान्य केलेले असले तरीपण ग्रामीण भागांतील स्त्रियांना तेथील पारंपरिक सामाजिक-सांस्कृतिक दृष्टिकोणामुळे हे अधिकार मिळत नाहीत. जमिनींवर त्यांचे हक्क नसतात आणि त्यांना बँकेकडून कर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. इंडोनेशियातील १९६०च्या कायद्यानुसार तेथील महिलांचा जमिनीवरील हक्क मान्य करण्यात आला आहे. मात्र

अशी परंपरा नसल्याने त्यांना हा हक्क प्रस्थापित करता आलेला नाही. जॉर्जियाच्या नागरी कायद्यानुसार, परंपरेने मिळालेल्या मालमत्तेवर, स्त्री-पुरुष अशा उभयतांना वारसा हक्काने समान हक्क प्रस्थापित करता येतो, स्त्री-पुरुष समानता तेथे यासंदर्भात मान्य करण्यात आली आहे. किर्गिझस्तान येथेदेखील कायद्यानुसार आर्थिक-सामाजिक क्षेत्रांत स्त्री-पुरुष समानता मान्य करण्यात आली आहे. तथापि सामाजिक संकेत अद्याप पूर्णपणे बदलले नसल्याने स्त्रियांना या कायद्यांचा लाभ घेता आलेला नाही.

## ग्रामीण भागांतील लोकसंख्येचे बदलते स्वरूप

गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागांतील लोकसंख्येचे स्वरूप काहीसे बदलते आहे. जन्मदर, मृत्यूदर, स्त्री-पुरुषांचे प्रमाण, त्यांना मिळणाऱ्या संधी, त्यांच्या गरजा अशा अनेक बाबींचा परिणाम लोकसंख्येच्या स्वरूपावर झालेला दिसतो. कुटुंबांनी स्थलांतर करणे किंवा कुटुंबप्रमुखाने उपजीविकेसाठी अन्य ठिकाणी जाणे व कुटुंबाने राहत्या गावीच शेती करणे यांमुळेही ग्रामीण भागांत बदल घडून येतात. आफ्रिकेतील देशांचा विचार करायचा झाला तर नागरी संघर्ष वा राष्ट्राराष्ट्रांमधील युद्धे यांचाही परिणाम त्यावर होत असतो. इतर देशांमध्येही असा परिणाम होऊ शकतो, होत असतो. याशिवाय आरोग्याचा मोठा प्रश्न ग्रामीण भागांत आढळतो. त्यातही एड्स् सारख्या रोगाने आणखीनच वेगळे प्रश्न निर्माण होतात.

या पार्श्वभूमीवर ग्रामीण लोकसंख्येसमोर, विशेषतः स्त्रियांसमोर, काही आव्हाने उभी ठाकतात. आरोग्याचे विविध प्रश्न योग्य पद्धतीने सोडविणे, एड्स्सारख्या रोगांचे स्त्रीजीवनावर व बालकांवर होणारे परिणाम लक्षात घेऊन तत्संबंधी योग्य ती काळजी घेणे, कुटुंबातील सदस्यांच्या संख्येनुसार, वयानुसार शेतीच्या कामातील त्यांचा सहभाग वाढणे वा कमी होणे अशा अनेक गोष्टींना सामोरे जाण्यासाठी स्त्रियांनी सक्षम असणे/बनविणे हे आवश्यक आहे. तसेच ग्रामीण भागातील नवयुवकांची संख्या लक्षात घेता, शेती व ग्रामविकासाच्या कामात त्यांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेणे हेही एक मोठे आव्हानाचे कार्य ठरते. या संघटनेने ग्रामीण भागांतील वृद्धांचा, स्थलांतरितांचा अभ्यास केला. लिंगभेदामुळे निर्माण होणारी असमानता, त्याचा गरिबीशी व अन्नधान्याच्या सुरक्षेशी असलेला संबंध समजावून सांगणे, एड्स्बाबत जागरुकता निर्माण करणे असे काही कार्य यासाठी करण्यात आले. शेती व ग्रामीण विकासासाठी युवकांचा कृतीशील सहभाग आवश्यक आहे हे लक्षात घेऊन युवकांच्या क्षमता व स्थानिक समित्यांमधील त्यांचा सहभाग वाढविणे असे कृतीकार्यक्रम संघटनेने आयोजित केले.

**माहितीचे युग**

'बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन' आणि 'मिलेनियम डिव्हलपमेंट गोल्स' यांनी पुढे आणलेल्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी ग्रामीण भागांतील महिलांना विविध विषयांची, त्या संबंधीच्या परिस्थितीची आणि आपल्या हक्कांची माहिती असायला हवी. गेल्या दोन दशकांत अशी काही माहिती त्यांच्यापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न बऱ्याच ठिकाणी झाला आहे. हे प्रयत्न चालू असतानाच सातत्यपूर्ण विकास आणि आर्थिक व सामाजिक विकास-विषयांबाबत असलेली स्त्रियांची भूमिका ही सरकार, प्रशासन आणि संबंधित संघटनांनी जाणून घेतली पाहिजे. असे कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना एकत्र येऊन माहितीचे जाळे गावोगावी पसरविण्याचे प्रयत्न करता येणे शक्य आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून अशी माहिती पोचविता येते. काही औद्योगिक कंपन्यांच्या वेबसाइटद्वारे असे करण्याचा उपक्रम या संघटनेने केला आहे. ग्रामीण विकासाची धोरणे आखतानाच ती प्रभावी ठरावी यासाठी विविध विषयांवरील लिंगसापेक्ष (जेन्डर सेन्सिटिव्ह) माहिती, आकडेवारी वा विश्लेषण यांच्या आधारे अभ्यासपूर्ण मांडणी करण्याचे या संघटनेने ठरवले आहे.

एकंदरीत असे लक्षात येते की, स्त्रियांना कागदोपत्री अनेक अधिकार मिळाले असले तरी स्त्रियांची तसेच पुरुषांची व एकूण समाजाची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत त्याचा फारसा काही उपयोग होत नाही. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'अन्न व कृषी संघटने'ने असे स्पष्ट केले आहे की, प्रत्येक देशाच्या विकासासाठी, विशेषतः ग्रामीण भागांतील विकासासाठी सर्व स्तरांवर आर्थिक व सामाजिक विषयांबाबत समाजात स्त्री-पुरुष समानता रुजली पाहिजे आणि त्यासाठी स्त्रियांनी सुशिक्षित व सक्षम होणे गरजेचे आहे. त्यांच्या अधिकारांप्रती समाजाला व स्त्रियांना स्वतःलाही सजग व्हावे लागणार आहे. महिलांना तत्त्वतः बहाल करण्यात आलेल्या अधिकारांची, महिलांच्या हक्कांची हमी देणाऱ्या कायदेशीर तरतुदींची व्यवहारांत अंमलबजावणी व्हावी यासाठी राष्ट्रसंघाच्या संघटना, स्वयंसेवी संघटना आणि प्रशासन अशा सर्वांनी कार्यतत्पर बनण्याची गरज आहे.

*(संदर्भ - 'टेन इयर्स आफ्टर द बीजिंग डिक्लेरेशन ॲंड द प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शनः ग्लोबल ट्रेंड्स् ॲंड जेन्डर मेनस्ट्रीमिंग' - कॅथेरिना हिल, ज्येष्ठ अधिकारी, जेन्डर ॲंड पॉप्युलेशन डिव्हिजन - FAO )*

(पान ३ वरून) एका संवेदनशील परंतु आशयदृष्ट्या कडकडीत विषयाला भिडणाऱ्या ४० पानी मजकुराचे वाचक कसे व कितपत स्वागत करतील, या बाबीचा विचार करून विशेषांकाची कल्पना बाजूस ठेवली. मात्र, रोजगार हा आपल्या सगळ्यांच्याच जिव्हाळ्याचा प्रांत आहे, हे ध्यानात घेता देशभर राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमाचे शक्यतो सर्वांगीण विवरण 'पत्रिके'च्या वाचकांपर्यंत पोहोचविणे हे अगत्याचे वाटते. किंबहुना, 'अर्थबोधपत्रिके'च्या उपक्रमामागील मूळ उद्देशाशी ते सुसंगतच आहे. त्या दृष्टीने 'पत्रिके'च्या या अंकाचा सुमारे एक चतुर्थांश भाग या विषयासाठी खर्ची घातला आहे. बरेच वेळा असे घडते की एखाद्या नवीन आणि महत्त्वाच्या कायद्यासंदर्भातील वेचक तेवढ्याच तरतूदी माध्यमांद्वारे समोर येतात. कायद्याचा मूळ दस्तावेज मिळवून तो वाचण्याएवढा वेळ व उत्साह आपल्यापैकी बऱ्याचजणांना राहात नाही. कायद्याच्या दस्तावेजाची परिभाषाही किचकट वाटावी अशीच असते. मात्र, अशा कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर त्याच्या अंतरंगाबाबत अधिक तपशील हाताशी असणे उपयुक्त वाटू शकते. हे ध्यानात घेता, 'पत्रिके'च्या या अंकात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या तरतूदींचा गोषवारा विस्तृत स्वरूपात दिला आहे - विस्तारभयाचे भान राखूनही! या कायद्याच्या अन्य पैलूंबाबत जी सांगोपांग चर्चा झाली तिचे सार 'पत्रिके'च्या वाचकांपर्यंत पुढील अंकांमधून सादर करण्याचा जो मानस आहे त्यास कायद्याच्या तरतूदींचा हा 'बॅकड्रॉप' आवश्यक ठरावा. तेव्हा, कायद्याच्या तरतूदी आवर्जून वाचण्यापेक्षा त्यांच्याकडे शक्यतो न फिरकण्याचीच सर्वसाधारण मानसिकता ध्यानात घेऊ नही असा तपशील देण्याचे धाडस केले आहे. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणाऱ्या वाचकवर्गाला ही रचना रुचेल अशी आशा आहे. सकृद्दर्शनी जड, कमालीचे तांत्रिक वाटणारे परंतु ज्यांचा परिचय करून घेणे हे आपल्या बौद्धिक-मानसिक गरजेचे असते असे विषय एकापेक्षा अधिक लेखांकांमधून वाचणे हे तुलनेने सोयीचे पडते. याच भूमिकेतून 'जेन्डर बजेट'सारख्या यापूर्वी परिचित झालेल्या संकल्पनेचे अन्य पैलू या अंकात मांडले आहेत. पर्यावरण आणि महिला यांच्या परस्परअनुबंधांचा धांडोळा घेणाऱ्या लेखाचेही सूत्र तेच आहे. ✿✿

# ग्रामीण रोजगार हमी कायदा म्हणतो......

'रोटी', 'कपडा' आणि 'मकान' या मनुष्यमात्रांच्या तीन मूलभूत गरजा आहेत, ही गोष्ट पार शालेय जीवनापासून आपल्या मनांवर बिंबविली जाते. परंतु, भाकरी मिळवून देणाऱ्या रोजगाराचा संबंध हा क्षुधानिवृत्तीपुरताच सीमित नसतो, याचे भान मात्र आपल्याला वय वाढल्यावरच येते. उपजीविकेसाठी नोकरीधंदा शोधणे हे रोजगाराच्या गरजेचे फार ढोबळ रूप झाले. ते महत्त्वाचे नाही, असे मुळीच नाही. परंतु, त्याच रोजगाराचे एक अत्यंत सूक्ष्म परिमाण मात्र आपल्याला अनेकदा तितक्या ठसठशीतपणे प्रतीत होत नाही. त्या परिमाणाचा धागा जुळलेला असतो प्रत्येकच व्यक्तीच्या ठायी वसणाऱ्या सर्जनशीलतेशी. आपण जेव्हा एखादे काम करीत असतो तेव्हा वास्तवात आपल्यातील निर्मितीक्षमतेचा एक आविष्कार तिथे साकारत असतो. म्हणजेच पर्यायाने, ते काम करणे, क्रियाशील असणे हा आपल्या 'माणूस'पणाचा एक पुरावाच असतो. रोजगाराकडे या अशा व्यापक व सूक्ष्म अंगाने बघितले की रोजगार मिळणे अथवा न मिळणे या बाबीचा संबंध केवळ उदरभरणाशीच असतो असे समजणे हे अपुरे आहे, याचे भान येते. उत्पादक - अनुत्पादक, कुशल - अकुशल असे रोजगाराचे जे श्लेष आपण मांडतो ते गैरवाजवी आहेत असे अजिबात नाही. मात्र, कोणत्याही स्वरूपातील रोजगाराच्या माध्यमातून व्यक्तीच्या ठायी असणाऱ्या सर्जनशीलतेचेच या ना त्या स्वरूपात संगोपन-संवर्धन होत असते, ही बाब नाकारता येणार नाही. परंतु, त्यासाठीही रिकाम्या हातांना कोणते ना कोणते काम मिळणे ही प्राथमिक गरज पूर्ण व्हावीच लागते. नव्याने अस्तित्त्वात आलेल्या 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्या'मागील प्रेरणा या विचाराशी सुसंगत अशीच ठरते.

महाराष्ट्रात सुमारे तीन तपांपूर्वी अस्तित्त्वात आलेली 'रोजगार हमी योजना' ही या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची पूर्वसूरी. ग्रामीण परिसरातील छुप्या तसेच हमखास आढळून येणाऱ्या हंगामी बेरोजगारीवर उतारा म्हणून योजिलेल्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयकास ५ सप्टेंबर २००५ रोजी संसदेची मंजुरी मिळाली आणि विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाले. सुरुवातीस देशभरातील २००

मागास जिल्ह्यांमध्ये या कायद्याची अंमलबजावणी होणार आहे. कायद्यातील तरतूदींनुसार मंजुरी मिळाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांत कायद्याची तामिली संपूर्ण देशभरात (जम्मू-काश्मीर वगळता) करण्यात येणार आहे. या कायद्याचे अपेक्षित तसेच संभाव्य परिणाम आगामी काळात दिसून येतीलच. अतिशय महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट असलेल्या आणि प्रतिवर्षी हजारो कोटी रुपयांच्या तरतूदीची अपेक्षा सरकारी तिजोरीकडून ठेवणाऱ्या या उपक्रमाच्या कायदेशीर तरतूदींचा परिचय असावा यासाठीच त्यांचा गोषवारा या ठिकाणी सादर केला आहे -

(१) उद्दिष्ट : देशाच्या ग्रामीण भागातील कुटुंबांच्या उपजीविकेची तरतूद करणे, उपजीविकेच्या उपलब्ध संधींमध्ये वाढ घडवून आणणे, हे या कायद्याचे आद्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास प्रत्येक वित्तीय वर्षात किमान १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देण्याची हमी कायद्यात आहे. अकुशल, शारीरिक श्रमांचे काम करण्याची तयारी असलेल्या ग्रामीण कुटुंबांतील प्रौढ व्यक्तींना राज्य सरकार रोजगार उपलब्ध करून देईल. त्यासाठी दिवसाकाठी ठराविक दराने मजुरी अदा करण्यात येईल. रोजगार पुरविण्यासाठी हाती घ्यावयाच्या कामांची, प्रकल्पांची सूची राज्य सरकारांनी कायद्यास मंजुरी मिळाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत तयार करावयाची आहे.

(२) इच्छुक लाभार्थींची नोंदणी : या कायद्यान्वये उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधीचा लाभ घेण्याची इच्छा असणाऱ्या ग्रामीण कुटुंबांतील सर्व प्रौढ व्यक्तींनी (ज्या व्यक्तींच्या वयास १८ वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा व्यक्ती) नोंदणीखातर आपापली नावे ग्रामपंचायत कार्यालयात दाखल करावयाची आहेत. त्यानंतर, योग्य त्या चौकशीअंती अशा कुटुंबांची तसेच त्या कुटुंबांतील इच्छुक प्रौढ लाभार्थींची नोंदणी करण्याची जबाबदारी कायद्याने संबंधित ग्रामपंचायतीकडे सोपविलेली आहे. नोंदणीकृत कुटुंबास अदा करण्यात यावयाच्या 'जॉब कार्ड'मध्ये इच्छुक प्रौढ लाभार्थींची छायाचित्रे चिकटवलेली असतील. नोंदणीकृत कुटुंबांतील प्रत्येक प्रौढ व्यक्ती त्याच्या इच्छेस येईल तितके दिवस रोजगार पुरविण्याबाबत अर्ज करू शकते. मात्र, एका कुटुंबास प्रत्येक वित्तीय वर्षात उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या रोजगार दिवसांची संख्या १००पेक्षा अधिक असणार नाही. एक वर्षादरम्यानच्या वेगवेगळ्या काळातील रोजगाराच्या गरजेनुसार रोजंदारीसाठी, एकापेक्षा अधिक असे, वेगवेगळे मागणी अर्ज दाखल करण्याची मुभा कायद्याने लाभार्थीस दिलेली आहे. मात्र, एखाद्या कुटुंबातील कितीही व्यक्तींनी

रोजगारासाठी अर्ज केले तरी कायद्यान्वये त्या कुटुंबास एका वित्तीय वर्षात कमाल १०० दिवसांचाच रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. इच्छुक लाभार्थीने रोजगाराची मागणी करणारा अर्ज दाखल केल्यापासून (अथवा त्याने रोजगार मागितलेल्या तारखेपासून) १५ दिवसांच्या आत त्याला काम देण्याची तरतूद कायद्यात आहे. रोजगार हमीचा लाभ ग्रामीण भागातील महिलांना विशेषत्त्वाने मिळावा, यासाठी कायद्यात एक कलम आहे. लाभार्थींमध्ये किमान एक तृतीयांश महिला असल्याच पाहिजेत, असे कायदा सांगतो. तसेच, रोजगार पुरविण्याबाबतही कायद्यात महिलांना प्राधान्य आहे. रोजगाराची मागणी करणारा अर्ज इच्छुक लाभार्थीने लेखी स्वरूपात ग्रामपंचायत अथवा संबंधित अधिकाऱ्याकडे (प्रोग्रॅम ऑफिसर) सादर करणे अपेक्षित आहे. असा अर्ज मिळाल्याची पावती लाभार्थीस रीतसर अदा केली जाईल. त्या पावतीवर त्या दिवसाची तारीख असेल. अर्जदार लाभार्थींना द्यावयाच्या रोजगार/ कामाचे प्रकटन लेखी स्वरूपात अधिसूचित केले जावे, असे कायदा सांगतो. असे लेखी प्रकटन ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर चिकटविले जावे, असे कायद्यात नमूद केले आहे. नोंदणीकृत कुटुंबे व त्या कुटुंबांतील नोंदणीकृत प्रौढ व्यक्तींची यादी ग्रामपंचायतीने 'प्रोग्रॅम ऑफिसर'कडे ठराविक मुदतीने सादर करावयाची आहे. रोजगार पुरविण्यात आलेल्या व्यक्तींची यादीही ग्रामपंचायतीचा सूचना फलक तसेच 'प्रोग्रॅम ऑफिसर'च्या कार्यालयात लावणे कायद्याने बंधनकारक आहे.

(३) रोजगार/ कामाचे ठिकाण : रोजगार मिळण्याबाबत अर्ज दाखल करणाऱ्या इच्छुक लाभार्थींना शक्यतो त्यांच्या गावाच्या पाच किलोमीटरच्या परिसरातच रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा, असे कायदा सांगतो. किमान ५० श्रमिक उपलब्ध होत असतील आणि या योजनेंतर्गत अगोदरच प्रवर्तित करण्यात आलेल्या कामांवर त्यांना सामावून घेणे शक्य होत नसेल तरच रोजगार हमीचा नवीन प्रकल्प/ नवीन काम हाती घेण्याची तरतूद कायद्यात आहे. मात्र, डोंगराळ विभागातील नवी कामे तसेच वनीकरणाच्या कामांना हे तत्त्व लागू होणार नाही.

(४) रोजंदारीचा दर : रोजगार हमी कायद्यांतर्गत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या रोजंदारीवरील मजुरीचा दर केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे निर्धारित करील. विभागा-विभागानुसार या मजुरी दरात फरक असेल. परंतु, वेळोवेळी अधिसूचित करण्यात येणारा हा दैनिक वेतन दर ६० रुपयांपेक्षा कमी मात्र असणार नाही. म्हणजेच, राष्ट्रीय रोजगार हमी कायद्यांतर्गत दैनंदिन मजुरीचा दर हा किमान ६० रुपये इतका सरसकट

राहील. हा दर पुरुष तसेच महिलांना सारखाच मिळेल. मजुरींची रक्कम पूर्णत: रोखीने अथवा पूर्णत: वस्तुरूपात अदा करण्याबाबतची तरतूद कायद्यात आहे. अथवा, ही मजुरी अंशत: रोखीच्या रूपात तर अंशत: वस्तूस्वरूपातही अदा करता येईल. मात्र, ही मजुरी कोणत्याही स्वरूपात देण्यात आली तरी एकूणाच्या किमान एक चतूर्थांश इतकी मजुरी तरी रोखीच्या रूपात अदा करण्याचा दंडक कायद्यात घालण्यात आला आहे. मजुरीच्या एकूण रकमेपैकी काही रोख रक्कम दर दिवशी लाभार्थीस अदा करण्याबाबत राज्य सरकार निर्णय घेऊ शकते. रोजगार हमीच्या कामांच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, लहान मुलांसाठी निवारा/आडोसा, प्रथमोपचाराची साधने यांसारख्या सुविधा पुरविण्यात याव्यात, असे कायद्यात नमूद करण्यात आले आहे.

(५) बेरोजगार भत्ता : रोजगार मिळण्याबाबत अर्ज केलेल्या ज्या इच्छुक लाभार्थींना त्यांचा अर्ज दाखल झाल्यापासून १५दिवसांच्या आत (अथवा त्यांनी रोजगार मागितलेल्या तारखेपासून १५ दिवसांत) काम दिले जाणार नाही, अशा अर्जदारांना बेरोजगार भत्ता अदा करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. रोजगार हमी कायद्यांतर्गत निर्धारित करण्यात आलेल्या दैनंदिन मजुरी दराच्या किमान एक चतुर्थांश दराने हा बेरोजगार भत्ता पहिल्या ३० दिवसांकरीता दिला जावा असे कायदा सांगतो. तर, वित्तीय वर्षातील उर्वरित कालावधीसाठी बेरोजगार भत्याचा हाच दर निर्धारित मजुरी दराच्या निम्मा असेल. केव्हा व कोणत्या परिस्थितीत अर्जदारास हा भत्ता अदा करण्यात येणार नाही, त्या संदर्भातील तरतूदीही कायद्यात स्पष्ट करण्यात आल्या आहेत. त्या तरतूदी अशा : (१) कामावर हजर होण्याबाबतचा आदेश अर्जदारास देण्यात आला असेल तर तेव्हापासून, (२) ज्या कालावधीसाटी रोजगाराची मागणी नोंदविली होती त्या कालावधीदरम्यान संबंधित कुटुंबातील एकही प्रौढ व्यक्ती रोजगाराकडे फिरकलीच नाही तर, (३) अर्जदार कुटुंबातील प्रौढ व्यक्तींना त्या वित्तीय वर्षात एकूण १०० दिवसांचा रोजगार पुरविण्यात आला असेल तर, (४) कायद्यात निर्धारित करण्यात आलेल्या वेतन दरानुसार किमान १०० दिवसांच्या रोजगाराद्वारे अर्जदार कुटुंबास एका वित्तीय वर्षात जेवढी प्राप्ती झाली असती तेवढी प्राप्ती त्या अर्जदार कुटुंबास मजुरी व बेरोजगार भत्ता यांच्या एकत्रित माध्यमातून झालेली असल्यास अशा कुटुंबांना बेरोजगार भत्ता अदा केला जाणार नाही. असा बेरोजगार भत्ता ज्या दिवसापासून देय आहे त्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा अधिक विलंब तो अदा होण्यास होता कामा नये, असे कायदा सांगतो. बेरोजगार भत्ता वेळेवर देण्यासंदर्भातील

विलंब जिल्हा समन्वयकाने सकारण अधिसूचित करावयाचा आहे. शक्य तेवढ्या त्वरेने राज्य सरकारने हा बेरोजगार भत्ता संबंधितांना अदा करावा, असे कायद्यात निर्देशित केले आहे. जे कुटुंब - (१) या योजनेंतर्गत देऊ करण्यात आलेला रोजगार/काम स्वीकारणार नाही; अथवा, (२) कामावर हजर होण्याबाबतची अधिसूचना प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कामावर हजर होणार नाही; अथवा, (३) परवानगीशिवाय सलग एक आठवड्यापेक्षा अधिक काळ कामावर अनुपस्थित राहील अथवा, एका महिन्यात एक आठवड्यापेक्षा अधिक काळ कामावर गैरहजर राहील असे कुटुंब बेरोजगार भत्त्याचा लाभ मिळण्यास तीन महिन्यांपर्यंत पात्र समजले जाणार नाही. मात्र, रोजगाराचा लाभ मिळण्यास ते पात्र समजले जाईल, अशी तरतूद कायद्यात करण्यात आली आहे.

(६) रोजगार हमीच्या कामांचे स्वरूप: या उपक्रमांतर्गत प्रवर्तित करावयाच्या कामांचे स्वरूप कशा प्रकारचे असावे, या बाबतही कायद्यात निर्देश आहे. ही कामे तसेच त्यांचा प्राधान्यक्रम असा:

१. जलसंधारण व जलसंचयन
२. दुष्काळ निवारण (वृक्ष लागवड आणि वनीकरण यांच्यासह)
३. सिंचनाचे कालवे, लघु तसेच अति लघु सिंचन प्रकल्प
४. अनुसूचित जाती तसेच जमातींच्या कुटुंबांच्या जमिनी, भूसुधारणा कार्यक्रमांचा लाभ मिळालेल्या लाभधारकांच्या जमिनी तसेच, केंद्र सरकारच्या इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थीसाठी सिंचनाच्या सुविधा तयार करणे.
५. पारंपरिक जलसाठ्यांचे नवीनीकरण, तसेच तळ्यांमधील गाळ उपसणे
६. जमीन सुधारणा उपक्रम
७. पूर नियंत्रण, सखल तसेच पाणी भरणाऱ्या परिसरांत पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा तयार करणे
८. बारमाही वाहतुकीची सुगमता पुरविण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागांतील चलनवलनाच्या सुविधा
९. राज्य सरकारशी सल्लामसलत करून केंद्र सरकार वेळोवेळी अधिसूचित करील असे अन्य कोणतेही काम

या योजनेच्या कार्यवाहीद्वारे टिकाऊ स्वरूपाच्या सुविधा तयार करणे, तसेच ग्रामीण भागांतील गोरगरिबांच्या उपजीविकेच्या साधनसामग्रीचा पाया अधिक बळकट

बनविणे हे या उपक्रमाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या योजनेंतर्गत प्रवर्तित करावयाच्या कामांसाठी/ प्रकल्पांच्या कार्यवाहीसाठी कंत्राटदारांची नियुक्ती करण्यास कायद्याने अनुमती दिलेली नाही. रोजगार हमीच्या उपक्रमांवर काम करणाऱ्या मजुरांना कायद्याने निर्देशित केलेल्या मजुरी दरानुसारच मजुरी अदा करावी लागेल. ज्या ठिकाणी मजुरीचा थेट संबंध कामाच्या प्रमाणाशी अथवा कामाच्या आकारमानाशी असेल त्या ठिकाणी राज्य सरकारने वेगवेगळ्या कामांसाठी निर्धारित केलेल्या मजुरी दरपत्रक आराखड्यानुसारच मजुरी अदा करावी लागेल. रोजगार हमींतर्गत प्रवर्तित करावयाच्या कामांसाठी वापरण्यात यावयाच्या साधनसामग्रीवरील खर्च, तसेच अशा कामांवरील कुशल व अर्धकुशल कामगारांच्या वेतनापोटी होणारा खर्च या उभय खर्चांचे प्रकल्पाच्या एकंदर खर्चातील प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये, असा कायद्याचा दंडक आहे. कायदा अस्तित्त्वात आल्यापासून तीन वर्षांच्या अखेरीस कायद्यांतर्गत तरतूदींमध्ये केंद्र सरकार बदल घडवून आणण्याबाबत विचार करू शकेल. तरतूदींमध्ये करण्यात आलेले बदल संसदेस सादर केले जातील.

(७) कामे/प्रकल्पांची निवड व निश्चिती : या कायद्यान्वये प्रवर्तित करावयाच्या कामे अथवा प्रकल्पांची निवड वा निश्चितीकरण हे **ग्रामपंचायतीने** करावयाचे आहे. अशी कामे ही ग्रामसभेने शिफारित केलेली असणे गरजेचे आहे. अशा कामांना जिल्हा परिषदेने मंजुरी दिल्यानंतर त्या कामांची कार्यवाही व त्या कार्यवाहीवरील देखरेख ही कायद्यानुसार ग्रामपंचायतीची जबाबदारी राहील. किंबहुना, ग्रामपंचायत क्षेत्रात प्रवर्तित करावयाच्या कामांची एक यादीच संबंधित ग्रामपंचायतीने तयार करणे अपेक्षित आहे. त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्थेतील मधल्या स्तरावरील पंचायत संस्थेकडे (पंचायत समिती) कामांचे हे प्रस्ताव ग्रामपंचायतीने छाननीसाठी सादर करणे हे कायद्याने बंधनकारक आहे. पंचायत समितीमधील 'प्रोग्रॅम ऑफिसर' ते प्रस्ताव छाननीनंतर अंतिम मंजुरीसाठी जिल्हा परिषदेस सादर करील. प्रवर्तित करण्यात आलेल्या कामांची 'सामाजिक तपासणी' (सोशल ऑडिट) करण्याचे उत्तरदायित्व या कायद्याने ग्रामपंचायतीकडेच सुपूर्त केलेले आहे.

(८) पंचायत समिती आणि **'प्रोग्रॅम ऑफिसर':** प्रत्येक पंचायत समितीमध्ये राज्य सरकार एका 'प्रोग्रॅम ऑफिसर'ची नियुक्ती करील. गटविकास अधिकाऱ्यास समकक्ष असा हा अधिकारी असेल. पंचायत समितीने नियोजिलेली रोजगार हमीची कामे तसेच तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींनी रोजगार हमी कायद्यांतर्गत प्रस्तावित

केलेली नानाविध कामे यांची एकत्रित यादी अथवा तक्ता तयार करण्याचे काम हा अधिकारी करील. छाननीअंती संबंधित पंचायत समितीने हा तक्ता मंजुरीसाठी जिल्हा परिषदेस सादर करावा, असे कायदा सांगतो. आपल्या प्रकल्प क्षेत्रातील रोजगाराची मागणी आणि प्रकल्प क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी यांची सुविहित सांगड जुळविणे, ही जबाबदारी कायद्याने या अधिकाऱ्याकडेच सोपविलेली आहे. तसेच, (१) ग्रामपंचायती व अन्य यंत्रणांनी तालुक्यात प्रवर्तित केलेल्या कामांवर देखरेख करणे (२) बेरोजगार भत्त्याच्या रकमेस मंजुरी देणे तसेच हा भत्ता प्रत्यक्षात अदा केला जातो आहे याची खात्री करणे (३) तालुक्यातील रोजगार हमीच्या कामांवर मजुरी करणाऱ्यांना रास्त दराने व वक्तशीरपणे मजुरी अदा केली जाते, या बाबत दक्षता घेणे (४) प्रकल्पांची सामाजिक तपासणी (सोशल ऑडिट) व्यवस्थित होते आहे, याची खात्री करणे तसेच, अशा तपासणीदरम्यान घेण्यात आलेल्या आक्षेपांबाबत तातडीने योग्य ती कृती करणे (५) रोजगार हमी उपक्रमाच्या कार्यवाहीसंदर्भात तालुक्यात कोठे काही तक्रारी असतील तर त्या संदर्भात त्वरेने कारवाई करणे या अन्य जबाबदाऱ्याही कायद्याने या अधिकाऱ्याकडे सोपविलेल्या आहेत.

(९) **जिल्हा परिषदेची जबाबदारी:** जिल्हा परिषदेसह त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्थेतील पंचायत समित्या व ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्था प्रस्तुत कायद्यांतर्गत प्रवर्तित करावयाच्या योजनांची आखणी, नियोजन तसेच अंमलबजावणीच्या मुख्य यंत्रणा असतील, असे हा कायदा सांगतो. या उपक्रमांतर्गत राबविण्याच्या कामांच्या प्रस्तावांना, याद्यांना जिल्हा परिषद तालुकावार मंजुरी देईल. या कामांवर देखरेख करण्याचे कामही कायद्याने जिल्हा परिषदेकडेच सुपूर्त केले आहे. या कायद्यान्वये हाती घेण्यात आलेल्या कामांचे सुसूत्रीकरण तसेच कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांवर देखरेख करण्यासाठी जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा जिल्हाधिकारी अथवा त्यांच्याशी समकक्ष असा एखादा अन्य अधिकारी 'जिल्हा समन्वयक' म्हणून नियुक्त केला जावा, अशी तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. या अधिकाऱ्याची कार्यकक्षाही नमूद केली आहे, ती अशी :

१. जिल्हा परिषदेस तिच्या कामकाजात साहाय्य करणे
२. पंचायत समित्या तसेच अन्य यंत्रणांनी तालुका पातळीवर केलेल्या योजनांचे सुसूत्रीकरण करणे
३. आवश्यक त्या प्रशासकीय मंजुऱ्या देणे

४. 'प्रोग्रॅम ऑफिसर्स'बरोबर समन्वय साधून रोजगाराच्या मागणीसाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस काम दिले जाईल, याची काळजी घेणे
५. 'प्रोग्रॅम ऑफिसर्स'च्या कामावर देखरेख, तसेच त्यांच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेणे
६. कार्यान्वित झालेल्या रोजगार हमी कामांची ठराविक काळाने पाहणी करणे
७. कामाच्या संदर्भात लाभार्थींना काही तक्रारी/गाऱ्हाणी असतील तर त्यांचे निराकरण करणे

या समन्वयकाने प्रत्येक वर्षीच्या डिसेंबर महिन्यात आगामी वित्तीय वर्षासाठीचे या उपक्रमासंदर्भातील अंदाजपत्रक तयार करावे, असे कायद्यात नमूद केले आहे. आगामी वित्तीय वर्षात जिल्ह्यात अकुशल, अंगमेहनतीच्या कामाबाबत किती मागणी येण्याची शक्यता आहे याबाबतचा अपेक्षित अंदाज, त्याबाबतचा तपशील तसेच या योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या विविध कामांवर या श्रमिकांना सामावून घेण्याबाबतचा आराखडा या अंदाजपत्रकात असावा, असे कायदा सांगतो. जिल्हा समन्वयकाने हे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेस सादर करावयाचे आहे.

(१०) राज्यस्तरीय यंत्रणा : ग्रामीण रोजगार हमी कायद्याची अंमलबजावणी राज्यभर कशा प्रकारे होते आहे, याबाबतचा आढावा घेऊन कायद्याच्या तामिलीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रत्येक राज्य सरकारने राज्य स्तरावर एक 'रोजगार हमी परिषद ' स्थापन करावी, असे कायद्यात म्हटले आहे. सरकारी अधिकारी, पंचायत राज्य संस्थांचे प्रतिनिधी, कामगार संघटना, महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक, मागास वर्गसमूह अशा विविध घटकांच्या प्रतिनिधींचा या परिषदेत अंतर्भाव असेल. या घटकांच्या प्रतिनिधित्त्वाचे प्रमाण तसेच या परिषदेची कार्यकक्षा यांचेही तपशीलवार विवरण कायद्याने दिलेले आहे.

(११) केंद्रस्तरावरील यंत्रणा : केंद्रीय स्तरावरही एक 'केंद्रीय रोजगार हमी परिषद' स्थापन करण्यात येईल, असे हा कायदा सांगतो. या परिषदेचे मुख्यालय दिल्ली येथे असेल. केंद्र सरकारची मंत्रालये, नियोजन आयोग, राज्य सरकार तसेच राज्यांचे प्रतिनिधी, पंचायत राज्य संस्थांचे प्रतिनिधी, कामगार संघटना, महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक, समाजातील उपेक्षित तसेच मागास वर्गसमूह अशा विविध घटकांच्या प्रतिनिधींचा या परिषदेत अंतर्भाव असेल. केंद्र सरकारच्या सेवेतील संयुक्त सचिवपदाच्या दर्जाचा अधिकारी या परिषदेचा सदस्य सचिव म्हणून

नियुक्त करण्यात येईल. या परिषदेच्या कार्यकक्षेचेही तपशीलवार विवरण कायद्यात नमूद करण्यात आलेले आहे.

(१२) निधीपुरवठा : या कायद्याच्या कार्यवाहीसाठी केंद्र सरकार एका अधिसूचनेद्वारे एक 'राष्ट्रीय रोजगार हमी निधी' स्थापन करील. अशाच प्रकारचा एक निधी राज्य सरकारेही राज्य स्तरावर स्थापन करतील. या योजनेच्या एकंदर खर्चातील केंद्र सरकार जो भार पेलेल त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

१. अकुशल, शारीरिक मेहनतीच्या कामापोटी दिल्या जाणाऱ्या मजुरीची पूर्ण रक्कम

२. रोजगार हमी कामांवर वापरल्या जाणाऱ्या साधनसामग्रीच्या खर्चाचा तीन चतुर्थांश हिस्सा (कुशल तसेच अर्धकुशल कामगारांना अदा केल्या जाणाऱ्या मेहनताऱ्यासह)

३. एकंदर प्रशासकीय खर्चाचा काही भाग (यात 'प्रोग्रॅम ऑफिसर्स'चे वेतन व भत्ते, त्यांच्या पूरक कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, केंद्रीय रोजगार हमी परिषदेचे प्रशासकीय खर्च तसेच कामाच्या ठिकाणी पुरविण्यात आलेल्या विशेष सुविधांवरील खर्चांचा समावेश असेल)

राज्य सरकारांनी ज्या खर्चांचा भार पेलावयाचा आहे, त्यांचा तपशील असा:

(१) बेरोजगार भत्त्यापोटी अदा करावयाची रक्कम

(२) रोजगार हमीच्या कामांवर वापरल्या जाणाऱ्या साधनसामग्रीवरील खर्चाचा एक चतुर्थांश हिस्सा (कुशल तसेच अर्धकुशल कामगारांना अदा करावयाच्या मेहनताऱ्यासह)

(३) कामांच्या ठिकाणी पुरविल्या जाणाऱ्या अन्य सुविधांवरील खर्च

(४) राज्यस्तरीय रोजगार हमी परिषदेचा प्रशासकीय खर्च

ग्रामीण भागांसाठी रोजगारची हमी देणारी एखादी योजना एखाद्या राज्यात अगोदरपासूनच सुरू असेल तर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यांतर्गत रोजगार तसेच वेतन दराबाबत आखून देण्यात आलेल्या किमान तरतूदींशी त्या योजनेचा मेळ घालून ती योजना चालू ठेवण्यात यावी, याबाबतची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील महत्त्वाच्या तरतूदींचा हा गोषवारा. या योजनेच्या विविध पैलूंची चर्चा यापुढे करताना हे सारे संदर्भ उपयुक्त आणि आवश्यक ठरतील.

## पर्यावरण

# टायर्सद्वारेही प्रदूषण

वाढते शहरीकरण हे आर्थिक विकासाचे एक मुख्य लक्षण मानले गेले असले तरी त्यातून काही ना काही प्रश्न सतत पुढे येत आहेत. असाच एक प्रश्न आहे वाहतुकीचा. मुंबईसारखे एखादे महानगर वगळता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न थोड्याफार फरकाने सर्वच महानगरांना, मोठ्या शहरांना भेडसावतो आहे. शहरांमधून दिवसेंदिवस वाढणारी दुचाकी व चारचाकी वाहने हा याचाच दृष्य परिणाम आहे. बेबंद शहरीकरणाचा हा रोग अलीकडच्या काळात छोट्या गावांपर्यंतही थोड्याफार प्रमाणात पोचू लागला आहे, तेथेही वाहनांची संख्या हळूहळू वाढू लागली आहे. वाहनांमुळे होणारे प्रदूषण आपल्या सर्वांना माहिती आहे. पण वाहने व प्रदूषण म्हटले की आपल्या डोळ्यापुढे चटकन येतो तो इंजिनमधून बाहेर पडणारा धूर. हा धूर तर वाईट आहेच; पण वाहनांचा पाया असणारी टायर्सदेखील प्रदूषणात मोठी भर घालत असतात. हे कसे घडते ?

इंजिनाच्या मदतीने वाहने धावत असली तरी त्यासाठीचे साधन असते ते चाक व त्यावरील आवरण म्हणजे टायर्स. टायर्समध्ये कधीतरी हवा भरणे, ते टायर पंक्चर झाले तर त्याची दुरुस्ती करणे आणि फार तर अतिवापराने गुळगुळीत झालेली टायर्स बदलणे इतपतच वाहनचालकाचा टायर्सशी संबंध येतो. आजकाल वाहनांद्वारे होणाऱ्या प्रदूषणाची पातळी कमी करण्यासाठी चाचणी करण्यात येत असली तरी ती इंजिनातून बाहेर पडणाऱ्या धुराची चाचणी असते. टायर्सद्वारेही प्रदूषण होऊ शकते वा होत असते हे चटकन ध्यानात घेतले जात नाही. हे टायर्स रबरापासून तयार करण्यात येतात तसेच एखाद्या विशिष्ट कंपनीचे टायर्स चांगले असतात ते बरेच टिकतात इतपतच जुजबी माहिती आपल्याला टायर्सबाबत असते. पण टायर्स म्हणजे रबर जेव्हा रस्त्याला घासले जाते तेव्हा नेमके काय होते याची माहिती आपल्यापर्यंत पोचलेली नसते. वेगवेगळ्या संशोधनांतून असे आढळून आले आहे की टायर्स रस्त्याला घासले गेल्याने त्यांची झीज होते. तेव्हा जे कण हवेत मिसळले जातात ते वेगवेगळ्या प्रकारची ॲलर्जी, दमा आणि हृदयविकार असे विकार जडण्यास कारणीभूत ठरतात.

टायर्सचा वापर सुरू झाला की त्यांच्या निर्मितीमध्ये वापरले गेलेले घटक त्यातून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरू होते अणि त्यामुळे हे घडते. वाहनाचे वजन वाहून नेणारी टायर्स जेव्हा सिमेंटच्या पृष्ठभागावर फिरतात वा घासली जातात तेव्हा त्याच्या घर्षणातून रबराचे अत्यंत सूक्ष्म कण बाहेर पडतात. त्यातील काहींचे हवेतच विघटन होते व ते हवेत मिसळले जातात. त्याला 'पार्टिक्युलेट मॅटर' वा 'टायर डस्ट' असे म्हटले जाते. काही कण तसेच रस्त्याच्या कडेला साचतात व इतर वाहने जेव्हा तेथून जातात तेव्हा धुरळा उडून ते वातावरणात मिसळले जातात. हवेचे प्रदूषण करणारे 'पार्टिक्युलेट मॅटर' हे आरोग्यासाठी अतिशय घातक असून ते टायर्समधूनच मोठ्या प्रमाणावर बाहेर पडते. १९७० तसेच १९८०च्या दशकाच्या सुरुवातीला जेव्हा या घटकांचा अभ्यास करण्यात आला तेव्हा हे कण मानवी शरीरात-फुफ्फुसांमध्ये प्रवेशण्याच्या दृष्टीने फार मोठे आहेत, त्यामुळे ते हानीकारक नाहीत असा निष्कर्ष काढण्यात आला होता. मात्र १९९०च्या दशकातील काही संशोधनांमधून असे आढळले की या 'पार्टिक्युलेट मॅटर्स'मधील ६० टक्क्यांपेक्षा जास्त कण हे सूक्ष्म असून ते फुफ्फुसांमध्ये प्रवेश करू शकतात.

टायर्समधून बाहेर पडणारे हे जे अत्यंत सूक्ष्म कण हवेत मिसळले जातात त्यात घातक अशा विविध घटकांचे मिश्रण असते. रबराच्या झाडापासून मिळणाऱ्या चिकट द्रवपदार्थापासून - लॅटेक्सपासून कठीण, कडक अशा टायर्सची निर्मिती होण्यासाठी अनेक रासायनिक घटक त्यात मिसळण्यात येतात, तसेच काही प्रक्रियाही त्यावर करण्यात येतात. या घटकांमध्ये झायलिन, बेन्झिन, पेट्रोलियम नाफ्ता, क्लोरिनेटेड सॉल्व्हंट, पॉलिसायक्लिक ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन्स व इतर काहींचा समावेश असतो. याशिवाय ॲन्थ्रेसिन, फेनानथेरिन, बेन्झोपायरिन, फेनॉल्स, अमाइन्स, खनिज तेल, विविध आम्ले व अल्कली, पॉलिक्लोरिनेटेड बायफिनाइल्स, हॅलोजिनेटेड सायनोअल्केन्स आणि प्लॅस्टिसायझर्स असे अनेक घटक त्यात असतात. टायर्स तयार करण्याच्या प्रक्रियेत झिंक, कॅडमियम, लीड (शिसे), क्रोमियम, कॉपर (तांबे) असे धातूदेखील वापरले जातात. टायर्स रस्त्यावर घासली जात असताना हे धातूही वातावरणात प्रवेश करतात. त्याचाही मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होतो. या संदर्भातील अभ्यासांतून असे आढळले की मानवी शरीरातील प्रतिकारशक्ती असणाऱ्या पेशी (इम्युन सेल्स) - मॅक्रोफेजेस -यांची मोठी हानी या प्रदूषणामुळे होते. त्यामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी होऊन त्यांवर सूज येऊ शकते.

या नंतर गेल्या २०-२५ वर्षांत झालेल्या अनेक संशोधनांतून असे आढळले की, 'पार्टिक्युलेट मॅटर्स'मुळे दमा व विविध प्रकारच्या अॅलर्जी यांत वाढ होते. त्यामुळे वाहनांमधून बाहेर पडणारा धूर, विशेषतः डिझेलचा धूर यावर ठपका ठेवण्यात आला. अलीकडे मात्र ही टायर्सही याच प्रदूषणात मोठी भर पाडत असल्याचे लक्षात आले आहे. १९९४ मध्ये 'अर्काइव्ह्ज ऑफ एन्व्हार्यनमेंटल हेल्थ' या अभ्यासात असे नमूद करण्यात आले होते की, बर्मिंगहॅम रुग्णालयात श्वसनाच्या तक्रारीमुळे दाखल झालेल्या रुग्णांमध्ये गर्दीच्या रस्त्यानजीक राहणाऱ्या मुलांचे व मोठ्यांचे प्रमाण जास्त होते. टायर्समुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या अभ्यासाला कारणभूत ठरलेली बाब म्हणजे लॅटेक्सचे हातमोजे. एड्स् व इतर रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून वैद्यकीय तज्ज्ञांनी व आरोग्यसेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सुरक्षा म्हणून हे हातमोजे वापरण्याचे ठरवले. त्यामुळे त्यांच्यात अॅलर्जीचे प्रमाण वाढल्याचे आढळले. याचबरोबर गर्दीच्या ठिकाणी राहणाऱ्या व्यक्तींचा वेगवेगळा अभ्यास केला तेव्हाही असे आढळले की लॅटेक्स पासून तयार झालेल्या टायर्सच्या 'पार्टिक्युलेट मॅटर्स' द्वारा होणाऱ्या प्रदूषणामुळे सर्दी होणे, डोळ्यांमधून पाणी येणे, दमा असे त्रास होतात. तसेच क्वचितप्रसंगी जीवाला धोका उत्पन्न करणारी स्थिती - 'अॅनाफिलिक्टिक शॉक' - निर्माण होऊ शकते. चिंताजनक बाब अशी की लॅटेक्सच्या अॅलर्जीमुळे इतर काही फळांच्या (उदाहरणार्थ केळी, पीच, किवी, टोमॅटो तसेच बटाटा, शेंगदाणे इत्यादी) अॅलर्जीही उद्‌भवू शकतात. त्याला 'लॅटेक्स-फ्रुट सिंड्रोम' असे म्हणतात. तथापि टायर्समधील लॅटेक्स आणि 'लॅटेक्स-फ्रुट सिंड्रोम' यांच्यातील परस्परसंबंध अद्याप स्पष्ट झालेला नाही. 'अॅन्युअल रिव्ह्यूज ऑफ पब्लिक हेल्थ'मध्ये काही संशोधकांनी असे नोंदवून ठेवले आहे की एक घनमीटर हवेतील 'पार्टिक्युलेट मॅटर्स' जर २० मायक्रोग्रॅमने वाढले तर विविध कारणांनी होणाऱ्या मृत्यूंमध्ये एक टक्क्याने वाढ होते. लॉसएंजेलिस येथील रहिवाशांच्या केलेल्या एका अभ्यासातून असे आढळले की सभोवतालच्या परिसरांत 'पार्टिक्युलेट मॅटर्स'चे प्रमाण जेव्हा दर दहा टक्क्यांनी वाढते तेव्हा कोणत्याही कारणांनी मृत्यू ओढवण्याच्या प्रमाणात ११ ते १७ टक्क्यांनी वाढ होण्याचा धोका संभवतो. या 'पार्टिक्युलेट मॅटर्स'मुळे हृदयाची गती मंदावते आणि हृदयक्रिया अचानक बंद पडण्याच्या शक्यता वाढतात, असेही म्हटले गेले आहे.

रस्त्यांवर रोज धावणाऱ्या गाड्यांच्या टायर्समुळे होणाऱ्या प्रदूषणचा प्रश्न आहे तसाच वापरून झालेल्या टायर्सचे काय करायचे हाही एक वेगळाच मुद्दा आहे.

२००३ साली एकट्या अमेरिकेत सुमारे २९ कोटीं टायर्स बाद करण्यात आली होती. ब्रिटनमध्ये सुमारे चार कोटी टायर्स वापरातून काढून टाकण्यात आली होती. वापरातून बाद झालेल्या टायर्सची विल्हेवाट लावण्याच्या समस्येचे परिमाण किती प्रचंड आहे, याची चुणूक दाखविणारी ही केवळ दोन उदाहरणे. ब्रिटनमध्ये अशी जुनी टायर्स मोकळ्या जागी वा इतरत्र कुठेही ठेवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. त्यातील रासायनिक घटकांमुळे ही टायर्स जाळून नष्ट करणे शक्य नाही. कारण, ती तशी जाळतानाही हवा प्रदूषित होईल. त्यामुळे त्यांचे करायचे तरी काय, हा एक मोठा प्रश्न या देशांना पडलेला आहे. सध्यातरी टायर्स फेकून देण्यापेक्षा ती दुरुस्त करण्यावर या देशांनी भर दिला आहे. आज ना उद्या हा प्रश्न भारतालाही भेडसावणार आहेच.

रस्त्यांवरील वाहनांची संख्या जेवढी जास्त तेवढे हे टायर्सचे प्रदूषण अधिक होणार हे उघडच आहे. पण वाढते शहरीकरण अंणि वाहनांची वाढती संख्या याला अटकाव तरी कोण नि कसे करणार, हाच खरा प्रश्न आहे !

*(संदर्भ - द इकॉलॉजिस्ट, नोव्हेंबर २००५)* ✿✿

---

*(पान १८ वरून)*

म्हणजे त्यांना या प्रक्रियेत सामावून घेण्याची समाजाची/पुरुषांची मानसिकता तयार झाली (?). (२)महिलांना पर्यावरणाच्या क्षेत्रामध्ये स्वतःची क्षमता, बुद्धिमत्ता आणि व्यवस्थापन कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली. (३) समाजात स्त्री-पुरुष समानतेसाठी अनुकूल वातावरण तयार झाले. (४) पर्यावरण संवर्धन आणि व्यवस्थापनात स्त्रियांच्या विकासाला अग्रक्रम दिल्याने स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणास हातभार लागला.

वर उल्लेखित अधिवेशनांमधून मांडलेल्या सर्वच योजना राबविल्या गेल्या किंवा त्या सगळ्याच यशस्वी झाल्या असे नाही. परंतु, त्यामुळे पर्यावरणविषयक समस्या सोडविण्यासाठी एक दिशा मिळाली. समाजातील विषमतेच्या विरोधात जनमत तयार झाले. एका अर्थाने ही सामाजिक परिवर्तनाची सुरुवातच म्हणायला हवी.

*(संदर्भ - डिबेटिंग दि अर्थ, बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन तर्फे आयोजित करण्यात आलेली अभ्यासकांची चर्चा)* ✿✿

# वाद साखरेच्या पर्यायाचा

साखरेला पर्याय म्हणून कमी उष्मांक असलेली बरीच 'शुगर फ्री' उत्पादने बाजारात असून मधुमेह असणाऱ्या रुग्णांच्या जीवनाचा ती एक महत्त्वाचा भाग बनली आहेत. यांत ॲस्परटेम हा घटक असून तो शरीराला अपायकारक ठरतो असे अलीकडच्या संशोधनामधून आढळले आहे. या घटकामुळे कॅन्सर होण्याच्या शक्यता मोठ्या प्रमाणावर वाढतात असे 'सेसार माल्टोनी कॅन्सर रिसर्च सेंटर ऑफ द युरोपियन रामझिनी फौंडेशन ऑफ ऑन्कॉलॉजी अँड एन्व्हायर्नमेंट सायन्सेस' येथील संशोधकांनी म्हटले आहे. या संशोधकांनी १८०० उंदरांवर या घटकाचा परिणाम कसा होतो ते बघितले. या घटकाची जेवढी मात्रा माणसांसाठी ठरविण्यात आली आहे तेवढीच मात्रा उंदरांना देण्यात आली. तीन वर्षांच्या या काळात या उंदरांची सतत तपासणी करण्यात येत होती. त्यांच्यात कॅन्सरची वाढ झाल्याचे संशोधकांना आढळले. प्रयोगादरम्यान तीन वर्षांनंतर ते उंदीर नैसर्गिकरीत्या मेले. पण हे संशोधन ॲस्परटेम उत्पादक कंपन्यांनी मान्य केलेले नाही. त्यांचे म्हणणे असे की, ॲस्परटेम घेणारे अनेक नागरिक वर्षानुवर्षे ठराविक मात्रेत ॲस्परटेम घेत आहेत, पण त्यांना काही झालेले नाही. त्यांच्या मते या संशोधकांनी उंदरांना जास्त प्रमाणात मात्रा दिली असावी. पण संशोधकांनी त्यांचे म्हणणे बरोबर नसल्याचे म्हटले आहे व ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. यापूर्वीही काही संशोधकांनी ॲस्परटेम हानिकारक असल्याचे म्हठले होते (पाहा - अर्थबोधपत्रिका - जानेवारी २००५, पृष्ठ क्रमांक २५ ). पण संबंधित यंत्रणेद्वारे या संदर्भात कोणतीही कडक पावले उचलण्यात आलेली नाहीत. या अलीकडच्या संशोधनानंतरही ॲस्परटेमबाबतचे चर्चेचे गुऱ्हाळ चालूच आहे.

# हाडांसाठी वनौषधी उपयुक्त

हाडे मोडल्यास ती जुळून येण्यासाठी व त्यात बळकटी आणण्यासाठी भारतात जुन्या काळापासून वनौषधींमधील अस्थिशृंखला (संस्कृत) - शास्त्रीय नाव Cissus quadrangularis - बोलीभाषेत 'हाडजोड' - हे औषध वापरण्यात येते. या औषधांमुळे

मोडलेले हाड जुळून येण्याच्या कालावधीत ३० ते ५५ टक्क्यांनी घट होते, असे यापूर्वी केलेल्या चाचण्यांमधून आढळले होते. त्यामुळे या वनस्पतीत नेमके कोणते घटक आहेत हे शोधण्याचा प्रयत्न पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील (NCL) काही संशोधकांनी केला. त्यासाठी त्यांनी या वनस्पतीचे मूळ पाण्यात उकळले. तयार झालेल्या द्रावणात कॅल्शियम व फॉस्फरस हे दोन घटक त्यांना मोठ्या प्रमाणावर आढळले. हेच घटक आपल्या हाडांमध्ये असून ते कॅल्शियम हायड्रोक्झापाटाइट (Calcium hydroxyapatite) या स्वरुपात आढळतात. यानंतर या द्रावणाच्या संपर्कात कार्बनडायऑक्साइड हा वायू आणण्यात आला असता कॅल्शियम कार्बोनेटचे स्फटिक तयार झाल्याचे आढळले. याचा अर्थ या वनस्पतीतील घटकांनी शरीरात प्रवेश केल्यानंतर शरीरातील काही घटकांचा संयोग होऊन कॅल्शियम हायड्रोक्झापाटाइट शरीरात तयार होत असावे, असा या संशोधकांचा अंदाज आहे. या वनस्पतीत हाडांची झीज भरून काढण्याचा गुणधर्म असणारेही घटक आढळले ( हाडांची झीज होऊन ऑस्टिओपोरोसिस ही व्याधी होते). तसेच प्रौढावस्थेतील स्त्रियांना होणाऱ्या काही विकारांवरही ही वनस्पती उपयुक्त ठरू शकते, असेही चाचण्यांमधून आढळले आहे

# टिश्यू पेपर्स

हॉटेल संस्कृती फोफावलेल्या या काळात 'टिश्यू पेपर' वा 'पेपर नॅपकीन' हा शब्द बहुतांश लहान-थोरांना माहिती झाला आहे. हे टिश्यू पेपर्स झाडांपासून बनविले जातात. 'झाडे वाचवा, जग वाचवा' असे सतत म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात या टिश्यूसाठी मात्र हजारो झाडे तोडली जात आहेत. यासंदर्भात 'वर्ल्ड वाइड फंड'ने (WWF) केलेल्या अभ्यासानुसार दरदिवशी वापरल्या जाणारा टिश्यू पेपरचा कचरा हा साधारणपणे २ लाख ७० हजार झाडांइतका भरतो. टिश्यू पेपर्स तयार करणाऱ्या युरोपमधील पाच मोठ्या कंपन्यांचे अहवाल यासाठी तपासण्यात आले. या कंपन्यांनी झाडे तोडून टिश्यूची निर्मिती करण्यापेक्षा पुनर्प्रक्रिया केलेला कच्चा माल वापरून टिश्यू पेपर्स तयार करावे असे वर्ल्ड वाइड फंडने सुचविले आहे. टिश्यूचा वापर करणाऱ्यांनी देखील पुनर्प्रक्रिया केलेला टिश्यू पेपर मिळावा अशी मागणी करावी असेही त्यांनी म्हटले आहे.

*(संदर्भ -करंट सायन्स, २५ नोव्हेंबर २००५, डाउन टू अर्थ ३१ डिसेंबर २००५)*

# जराहि न दिसेल बेकारी वाढली कोठे...

*गावचे कलावंत निपुण। त्यांना द्यावे उत्तेजन।*
*नवनव्या वस्तु कराव्या निर्माण।उपयोगाच्या जीवनासि।।*
*उद्योगे यंत्रेहि निर्मावी।परदेशा भीक न मागावी।*
*आपणचि करोनि भोगावी।वैभवे सारी।।*
*चरखा-टकळी पासूनि उद्योग। अन्नधान्यादिकांचे प्रयोग।*
*घरेदारे सर्व सुयोग। आपणचि निर्मावे।*
*प्रत्येक घरी जोडधंदा। सर्व स्त्री-पुरुष याची छंदा।*
*दूर करावया आपदा। जीवनाच्या लागावे।।*
*कोणी पिशव्या, कोणी नवारी। कोणी खादी विणतो घरी।।*
*कोणी चपला चामडियाच्या करी। मेल्या जनावरांच्या।।*
*कोणी चटया, कोणी आसने। कोणी खुर्च्या, कोणी खेळणे।*
*कोणी बादल्या, पलंग, गोणे। साबणहि घरी करी।।*
*कोणी सुंदर मडके घडवी। कुंड्या, फुल-पात्रे बरवी।*
*कोणी कवेलू मजबूत दावी। करोनिया सुंदरसे।।*
*कोणी सुंदर विटा करी। कोणी फाडी फोडी बरी।।*
*सर्व हे आपापल्या परी। घरोघरी कार्यरत।।*
*कोणी बैलांचा साज करी। कोणी रंग शोधी परोपरी।*
*प्रत्येकजण काहीतरी। करितचि आहे।।*
*ऐसे हे सर्व गाव। जोडधंद्यांनी भरीव।*
*जराहि नाही उणीव। कोणेपरी कोठे।।*
*ऐसी असावी कलाकुसरी। उद्योगधंदे घरोघरी।*
*जराहि न दिसेल बेकारी। वाढली कोठे। (१८.५७ ते १८.६७)*

'ग्रामगीते'ची प्रथम आवृत्ती १९५५ साली प्रकाशित झाली त्या वेळी स्वातंत्र्य मिळून अवघी आठ वर्षे उलटली होती. मात्र, बेरोजगारीची समस्या जाणवण्याइतपत तीव्र

तेव्हाही असावी, या वास्तवाचे प्रतिबिंब तुकडोजींच्या प्रस्तुत वेच्यात पडलेले आढळते. तुकडोजींसारख्या समाजमनस्कांना समाजातील बेरोजगारीची समस्या तेव्हाही भेडसावत होती. आज स्वातंत्र्य मिळून जवळपास ६० वर्षे होत आली. या आपल्या वाटचालीदरम्यान बेरोजगारीचे आव्हान उत्तरोत्तर बिकटच होत गेल्याचे आपण अनुभवतो आहोत. भरपूर उत्पादन हेच जनसेवेचे साधन आहे, ही तुकडोजींची धारणा आहे. असे मुबलक उत्पादन गावात तयार व्हावे यासाठी उद्यमशीलतेची कास घरोघरी धरली जाणे आवश्यक ठरते. यातून दोन गोष्टी साध्य होतात. एक म्हणजे गावच्या उत्पादनाचा पाया विस्तारतो आणि दुसरे म्हणजे स्वयंरोजगाराची संस्कृती गावात रुजल्याने बिगर शेती क्षेत्रातील रोजगाराचाही प्रश्न सुटतो. त्यातून शेतीवरील अतिरिक्त मनुष्यबळाचा भार हलका होण्याच्या वाटा मोकळ्या होतात. गावपातळीवरील कारागीरांना उत्तेजन दिल्याने स्थानिक पातळीवरच शेतीपूरक तसेच बिगर शेतीस्वरूपाचे किती नानाविध व्यवसायधंदे साकारू शकतात, याची तुकडोजींनी सादर केलेली यादी मननीय आहे. रोजगारनिर्मितीचा हा एक ठोस मार्ग तुकडोजींनी समोर मांडला आहे. ग्रामीण भागांतील बेरोजगारीवर उतारा म्हणून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा एक पर्याय सरकारने अंगिकारला आहे. याद्वारे रोजगार तसेच उत्पन्नाचा एक स्त्रोत ग्रामवासीयांना उपलब्ध होईल. परंतु, या उपक्रमास गावातील उद्यमशीलतेच्या विकासप्रयत्नांचीही जोड मिळाल्यास त्यातून स्वयंरोजगाराची संस्कृती निर्माण होऊन बेरोजगारीच्या प्रश्नावरील कायमस्वरूपी तोडगा नजरेच्या टप्प्यात येईल. पर्यायाने, 'जराहि न दिसेल बेकारी वाढली कोठे', हा तुकडोजींचा आशावादही वास्तवात उतरण्याच्या शक्यता रुंदावतील. ✿✿

## भेट अंक योजना

**'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना पत्रिकेचे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.**

# आपली स्वप्नं पूर्ण करा !

- गृह कर्ज
- आधार स्कीम
- ग्राहकोपयोगी कर्ज
- किसान क्रेडिट कार्ड
- शैक्षणिक कर्ज
- रिकरिंग डिपॉझिट स्कीम

अवघ्या कुटुंबाची....
अवघ्या समाजाची
बांधिलकी जपणारी...
महाबँक



New Horizon '04

बँक ऑफ महाराष्ट्र
'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे-411 005.
www.maharashtrabank.com


## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१५ ऑक्टोबर २००४ पासून )

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८० / - रुपये |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) अर्थबोधपत्रिकेचा मेंदूसंशोधन विशेषांक (फेब्रुवारी - मार्च २००५) - (किंमत चाळीस रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

Privatization in India - Challenging Economic Orthodoxy, by T.T. Ram Mohan; PublisherRoutledge CurZon, London ; pp.218; Price- Rs.595/-

खासगीकरण हे तसे १९८०च्या दशकातले. भारताच्या शैक्षणिक आणि बौद्धिक वर्तुळांमध्ये पुरेशी चर्चा होण्याआधीच राबवायला सुरुवात झालेले. खरे तर खासगीकरण म्हणजे सरकार आणि बाजारयंत्रणा यांच्या सापेक्ष भूमिकांचा समतोल साधायची एक प्रक्रिया; अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांप्रमाणेच धोरणकर्त्यांनाही याची जाणीव असते; पण सर्वसामान्यपणे प्रत्यक्षात मात्र ही संकल्पना केवळ संस्थांच्याच संदर्भात वापरली जाते आणि मग संस्थांची मालकी, त्यांचे नियंत्रण सरकारकडून काढून घेऊन खासगी क्षेत्राकडे वर्ग करणे म्हणजे खासगीकरण, असा एक सरळधोपट अर्थ लावला जातो. सार्वजनिक संस्था या खासगी संस्थांपेक्षा सरसकट वाईटच असतात (विशेषतः अधिक अकार्यक्षम) असे एक गृहीत यामागे असते. एकदा सार्वजनिक संस्था खासगी क्षेत्रात आणल्या म्हणजे त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होते, असाही समज असतो. पण या गृहीतात मुळातच कितपत तथ्य आहे याचा धांडोळा घेण्याबरोबरच, 'सार्वजनिक ते नेहमी वाईटच आणि खासगी ते नेहमीच चांगले' या प्रस्थापित विचारधारेला (ऑर्थाडॉक्सी) आव्हान द्यायचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकात केलेला आहे. यासाठी लेखकाने वित्तीय साधने, आदान -उत्पादनाचे प्रमाण इत्यादी घटकांचा वापर करून उद्योग क्षेत्रातल्या सार्वजनिक आणि खासगी बँकांचीही अशीच तुलना केली आहे. लेखकाने असा निष्कर्ष काढला आहे की, सार्वजनिक संस्थांची खासगी संस्थांना सरळसरळ विक्री करणे, हा काही त्यांची कार्यक्षमता उंचावण्याचा एकमेव मार्ग नाही. अशी विक्री करण्याआधी त्यांच्या भागधारणाचा पाया अधिक व्यापक करण्याच्या पर्यायाचाही विचार व्हायला पाहिजे. त्यांची कार्यक्षमता सुधारण्याचा तो एक तुलनेने अधिक स्वीकारार्ह मार्ग आहे असे लेखकाचे मत आहे. पुस्तकाचे अन्य एक वैशिष्ट्य म्हणजे चीनमधील खासगीकरणाचाही साराशांत्मक आढावा यात आहे. खासगीकरणाच्या संदर्भातल्या भारताच्या अनुभवांचे पृथःकरण करण्याचा एक अभिनव दृष्टिकोण लेखकाने स्वीकारला असल्याने इतर देशांनाही उपयोगी पडू शकतील अशी साधने या पुस्तकात मिळू शकतील. ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ▪'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ▪भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ▪अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ▪इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करून प्रकाशित करणे.

**उपक्रम** ▪संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ▪संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ▪अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**